- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-
खामगाव-बुलढाणा-
अमरावती-वर्धा-यवतमाळ-
चंद्रपूर-गडचिरोली-
भंडारा-गोंदिया

दैनिक
# सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर    संचालक-संपादक : अजय बिवडे

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : मंगळवार, २२ सप्टेंबर २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २८३ | किंमत : २ रूपये

**सोने-चांदी**
- २४ कॅरेट : १,५८,७०० /-
- २३ कॅरेट : १,५६,३५० /-
- चांदी : २,७८,३००/-

Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

# शेतकऱ्यांचा टाहो, आता अपेक्षा शासनाकडे

## सरकारने पाहणी न करता दुष्काळ जाहीर करावा : रोहित पवार, सरकारला दिवस-रात्र सळो की पळो करून सोडणार : दानवे



**वृत्तसंस्था, मुंबई**
दीड-पावणेदोन महिने झाले, पावसाचा पत्ता नाही. ऐन गरजेच्या वेळी पाऊस गायब झाल्याने मराठवाडा, विदभार्तील शेतपिके करपून गेली. शेतशिवारात अक्षरशः पिकांचा धुरळा झाला. जिथे पिके आहेत, त्याला लागण नाही. त्यामुळे शेतपिकांची भीषण स्थिती असून, येत्या काळात जनावरांचा चारा आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर बनणार आहे. त्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. आता माय-बाप सरकारने तात्काळ दुष्काळ जाहीर करावा आणि शेतकऱ्यांना तातडीने मदत करावी, अशी आर्त हाक दिली जात असून, ही भीषण स्थिती पाहता अनेक शेतकऱ्यांनी पाहणी दौऱ्यात अक्षरशः हंबरडा फोडला. परंतु सरकार ५ ऑक्टोबरच्याच मुहूर्ताची वाट पाहात आहे.

यावर आ. रोहित पवार यांनी शेतीत पाहण्यासारखे काहीच राहिले नाही. त्यामुळे दुष्काळ जाहीर करावा, असे म्हटले तर ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी सरकारला दिवसाच नव्हे तर रात्रीही सळो की पळो करून सोडावे लागेल, असा इशारा दिला.

यंदाच्या पावसाळ्यात राज्यातील काही भागांतच दमदार पाऊस झाला. परंतु मराठवाडा, विदर्भात सुरुवातीला जेमतेम पाऊस झाला. त्यामुळे खरीप पिके बहरली. परंतु ऐनवेळी पाऊस गायब झाल्याने संपूर्ण खरीप हंगामच धोक्यात आला आहे. गेल्या ५२ दिवसांपासून मराठवाडा, विदर्भात पाऊसच झाला नाही. त्यामुळे खरीप पिके जागेवरच करपली आहेत आणि जी पिके उभी आहेत, त्याला लागणच नाही. संपूर्ण खरीप हंगामच आता हातातून गेला आहे. त्यामुळे शेतकरी अभूतपूर्व संकटात सापडला आहे. अशा स्थितीत शेतकऱ्यांना तातडीने मदत दिली पाहिजे. यासाठी शेतकरी टाहो फोडत आहे. तसेच विरोधी पक्षांचे नेतेही पिकांची पाहणी करून मदतीची मागणी करीत आहेत. याशिवाय सत्ताधारी नेते, कृषिमंत्रीही बांधावर जाऊन पाहणी करीत आहेत. परंतु प्रत्यक्षात अद्याप शेतकऱ्यांना कुठलाही दिलासा दिलेला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोष वाढला आहे.

दरम्यान, याच मुद्यावरून आता ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी सरकारच्या नाकर्तेपणावर आक्रमक भूमिका घेतली असून, तीव्र संताप व्यक्त करीत मराठवाडा, विदर्भात दुष्काळाची परिस्थिती असताना तिकडे कोण पाहतंय? एकीकडे कर्नाटक १३० तालुक्यांत दुष्काळ जाहीर करतंय आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मुहूर्त पाहात बसले आहेत. या विषयावर सरकारला सडेतोड उत्तर द्यायला हवे. केवळ दिवसाच नव्हे तर रात्रीही उठता-बसता सरकारवर तोफ डागावी लागेल, असा इशारा त्यांनी दिला.

**पळ काढू देणार नाही**
माझ्या माहितीप्रमाणे ५२-५३ दिवसांपासून पाऊस नाही. पूर्वी २१ दिवसानंतर विमा मिळत होता. आता ५२ दिवसांपासून पाऊस नाही. एवढे दिवस पाऊस नाही. मग कोणते पीक जिवंत राहणार? कोरडवाहू पीक करपले. बागायती पिकाला वीज मिळात नाही. त्यामुळे तेही पीक जळून गेले. मग ५ ऑक्टोबरची वाट का बघता? सरकार प्रश्नातून पळ काढत आहे. पण आम्ही पळ काढू देणार नाही, असा इशारा दानवे यांनी दिला.

**सरकार दुष्काळ जाहीर करू शकते : शिरसाट**
राज्यात पावसाने दडी मारली आहे. मराठवाडा, विदर्भात भीषण दुष्काळी स्थिती आहे. कृषिमंत्री दत्तात्रय भरणे राज्यात पीक स्थिती समजून घेत आहेत. लवकरात लवकर दुष्काळ जाहीर करून भरीव मदत करावी, अशी शेतकऱ्यांची मागणी आहे. विरोधकही आक्रमक झाले आहेत. यावर आता मंत्री संजय शिरसाट यांनी लवकरच राज्य सरकार मोठा निर्णय घेऊ शकते. याबाबत मंत्रिमंडळ बैठकीत चर्चा होऊ शकते, असे म्हटले. सध्या शेतक-यांना भरीव मदत देणे गरजेचे आहे, असेही शिरसाट म्हणाले.

**उद्योगपतींचे १० लाख कोटी माफ, शेतकरी वाऱ्यावर का?**
२०१४ ते २०२६ या १२ वर्षांच्या काळात केंद्र सरकारने उद्योगपती आणि कॉर्पोरेट क्षेत्राचे तब्बल १० लाख कोटी रुपयांचे कर्ज माफ केल्याची सरकारी आकडेवारी समोर आली आहे. मात्र, शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी एक-एक रुपयाचा विचार केला जात आहे. हे धक्कादायक वास्तव समोर आल्याने सरकारविरोधात तीव्र संताप व्यक्त होत आहे.

**एवढा भीषण दुष्काळ आयुष्यात पाहिला नाही**
पिकांची जी भीषण स्थिती आहे ना, ती पाहता एवढा भीषण दुष्काळ मी माझ्या आयुष्यात पाहिला नाही. सोयाबीन, कापसाचे सर्वांत मोठे नुकसान झाले आहे. उसाचीही हानी झाली.

या दुष्काळाच्या मदतीसाठी एक प्रक्रिया आहे, नियमावली आहे. त्यानुसार एनडीआरएफप्रमाणे शेतकऱ्यांना मदत दिली जाणार आहे. एवढेच नव्हे तर लवकरच दुष्काळही जाहीर होणार आहे, असे सहकारमंत्री बाबासाहेब पाटील म्हणाले.

थोडक्यात

## स्लॅब कोसळला, २ ठार

**सांगली :** मिरज शहरातून एक अत्यंत धक्कादायक आणि दुर्दैवी घटना समोर आली आहे. येथील शासकीय रुग्णालयाच्या प्रवेशद्वारावर उभारण्यात येत असलेल्या नवीन कमानीचे काम सुरू असताना अचानक स्लॅब कोसळून भीषण दुर्घटना घडली. या दुर्घटनेत ढिगाऱ्याखाली दबले जाऊन २ जणांचा मृत्यू झाला असून ७ ते ८ जण गंभीर जखमी झाले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, मिरज सिव्हिल हॉस्पिटलच्या बाहेरील मुख्य प्रवेशद्वारावर एका नवीन कमानीची उभारणी केली जात होती. काही वेळापूर्वीच या कमानीवर स्लॅब टाकण्याचे काम सुरू होते. मात्र, काम सुरू असतानाच अचानक हा स्लॅब कोसळला. कमान कोसळल्याचा आवाज इतका भयंकर होता की, परिसरात एकच खळबळ उडाली आणि मोठा गोंधळ निर्माण झाला. सुदैवाने, ढिगाऱ्याखाली अडकलेल्या ५ ते ६ जणांना सुखरूप बाहेर काढण्यात बचाव पथकाला यश आले आहे. या दुर्घटनेत जवळपास ७ ते ८ कामगार गंभीर जखमी झाले असून, त्यांना तातडीने उपचारासाठी त्याच रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिस दल, अग्निशमन दलाचे बचाव पथक आणि रुग्णालय प्रशासनाने घटनास्थळी धाव घेतली. सध्या जेसीबी मशिनच्या साहाय्याने स्लॅबचा ढिगारा बाजूला करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे.

# देशाला आता अर्णब चक्रीवादळ धोका?



**वृत्तसंस्था, कोलकाता**
भारतात सध्या दोन मोठ्या हवामान धोक्यांचा सामना करत आहे. एकीकडे पॅसिफिक महासागरात एल निनो अधिक तीव्र होत आहे. तर दुसरीकडे बंगालच्या उपसागरात चक्रीवादळाची शक्यता आहे. हवामान विभागाच्या मते, जर बंगालच्या उपसागरातील कमी दाबाची प्रणाली अधिक तीव्र होऊन तिचे चक्रीवादळात रूपांतर झाले, तर त्याला अर्णब असे नाव दिले जाईल. ही प्रणाली २० ते २५ सप्टेंबर दरम्यान सक्रिय होऊ शकते.

यामुळे ओडिशा आणि उत्तर आंध्र प्रदेशसह अनेक किनारपट्टीच्या राज्यांमध्ये मुसळधार पाऊस आणि सोसाट्याच्या वाऱ्यांचा धोका वाढला आहे. एल निनोच्या प्रभावामुळे देशाच्या अनेक भागांमध्ये आधीच दुष्काळ आणि कमी पावसाचा धोका निर्माण झाला आहे. या दोन्ही धोक्यांच्या एकत्रित परिणामामुळे भारताच्या हवामानावर गंभीर परिणाम होऊ शकतो. भारतीय हवामान विभागाच्या मते, अंदमान समुद्रात तयार झालेले कमी दाबाचे क्षेत्र पुढील दोन दिवसांत आणखी तीव्र होईल. २१ सप्टेंबर रोजी त्याचे तीव्र कमी दाबाच्या क्षेत्रात आणि २२ सप्टेंबर रोजी खोल कमी दाबाच्या क्षेत्रात रूपांतर होऊ शकते. २३ सप्टेंबरपर्यंत, ते आंध्र प्रदेश-दक्षिण ओडिशा किनारपट्टीजवळ पश्चिम-मध्य आणि लगतच्या वायव्य बंगालच्या उपसागरात पोहोचण्याची शक्यता आहे.

याची तीव्रता आणखी वाढली, तर त्याचे अर्णब चक्रीवादळात रूपांतर होऊ शकते. हवामान तज्ज्ञांच्या मते, सध्याची हवामानाची परिस्थिती अशी आहे की ही प्रणाली वेगाने विकसित होऊ शकते. त्यामुळे, किनारपट्टीच्या भागात सतर्कता बाळगणे आवश्यक आहे. हवामान विभागाने दक्षिण ओडिशा आणि उत्तर किनारपट्टी आंध्र प्रदेशसाठी विशेष सतर्कतेचा इशारा जारी केला आहे. २३ आणि २४ सप्टेंबर रोजी या भागांतील तुरळक ठिकाणी मुसळधार ते अति मुसळधार पावसाची शक्यता आहे. २४ सप्टेंबर रोजी दक्षिण छत्तीसगडमध्येही तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता आहे. २३ ते २५ सप्टेंबर दरम्यान छत्तीसगड आणि तेलंगणामध्ये, आणि २४ व २५ सप्टेंबर रोजी विदर्भामध्ये मुसळधार ते अति मुसळधार पावसाची शक्यता आहे. ओडिशामध्ये २३-२४ सप्टेंबर रोजी ताशी ५०-६० किमी वेगाने वारे वाहण्याची शक्यता असून, वा-याचे झोत ताशी ७० किमी पर्यंत पोहोचू शकतात. २३ सप्टेंबर रोजी दक्षिण ओडिशा आणि उत्तर आंध्र प्रदेशच्या किनारपट्टीवर ताशी ५५-६५ किमी वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. २३-२४ सप्टेंबर दरम्यान दक्षिण आंध्र प्रदेश आणि पश्चिम बंगालच्या किनारपट्टीवरही जोरदार वारे वाहण्याची शक्यता आहे.

**मुसळधार पावसाचा अंदाज**
अंदमान आणि निकोबार बेटे आणि गंगा खोऱ्यातील पश्चिम बंगालमध्ये २० ते २६ सप्टेंबर दरम्यान मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. झारखंड, ओडिशा आणि उप-हिमालयीन पश्चिम बंगाल-सिक्कीममध्ये २२ ते २६ सप्टेंबर दरम्यान पावसात वाढ होऊ शकते. बिहारमध्ये २४ ते २६ सप्टेंबर दरम्यान मुसळधार पावसाचा अंदाज आहे.

# इटलीत बुरखा, नकाबवर बंदी घालणार

**रोम :** इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांनी शाळांमध्ये बुरखा आणि नकाबवर बंदी घालण्याची घोषणा केली आहे. त्यांनी रविवारी सांगितले की, मंत्रिमंडळ लवकरच याबाबत निर्णय घेईल. याशिवाय, शाळांमध्ये परदेशी विद्यार्थ्यांची संख्याही मर्यादित ठेवली जाईल. मेलोनी यांनी राजधानी रोममध्ये त्यांच्या ब्रदर्स ऑफ इटली पक्षाच्या युवा संघटनेच्या राष्ट्रीय महोत्सवात ही घोषणा केली. प्रस्तावित नियमांनुसार, ज्या परदेशी विद्यार्थ्यांच्या मुलांना शाळेत मिसळून जाण्यात अडचण येते, त्यांच्या पालकांना इटालियन भाषा शिकावी लागेल. कायदा लागू करण्यासाठी सरकारच्या मंजुरीनंतर तो ६० दिवसांच्या आत संसदेत मंजूर करून घ्यावा लागेल. सध्या फ्रान्स आणि चीनसह जगातील २४ देशांमध्ये बुरखा आणि नकाबवर बंदी आहे.

**इटलीतील शाळांमध्ये ९.३ लाख परदेशी विद्यार्थी**
संशोधन संस्था फोंडाजियोने करटवच्या माहितीनुसार, इटलीतील शाळांमध्ये सुमारे ९.३ लाख परदेशी विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. हे देशातील शाळांमध्ये शिकणा-या एकूण विद्यार्थ्यांच्या तुलनेत ११.६% आहेत. गेल्या १० वर्षांत इटलीतील परदेशी अल्पवयीनांची संख्या ४.५% घटली आहे.

**युरोपीय न्यायालयाने बंदी योग्य ठरवली**
युरोपियन कोर्ट ऑफ ुमन राइट्सने फ्रान्स आणि बेल्जियममधील सार्वजनिक ठिकाणी बुरखा-नकाबवर घातलेली बंदी योग्य ठरवली आहे. फ्रान्समध्ये २०१४ आणि बेल्जियममध्ये २०१७ साली दिलेल्या निर्णयात न्यायालयाने म्हटले होते की, लोकांमधील परस्पर संवाद कायम ठेवणे हे अशा बंदीचे कारण असू शकते.

# महसुलमंत्र्यांचा 'आदर्श नोंदणी पॅटर्न' आता देशभरात!

## केंद्राकडून प्रत्येक कार्यालयाला ५० लाखांचे अनुदान, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळेंचे केंद्रीय सचिवांकडून कौतुक

**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई**
महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या संकल्पनेतून अस्तित्वात आलेल्या मॉडेल नोंदणी कार्यालयांच्या उपयोगितेची दखल केंद्र सरकारने घेतली असून, पुणे येथे सुरू झालेले मॉडेल नोंदणी कार्यालय आता देशभर प्रारंभ करण्याचे निर्देश केंद्रीय ग्रामीण विकास व पंचायत राज मंत्रालयाच्या भूमी संसाधन विभागाने दिले आहेत.



विशेष म्हणजे, केंद्रीय भू-संसाधन विभागाचे सचिव नरेंद्र भूषण यांनी अशी कार्यालये देशभर सुरू करण्यासाठी प्रत्येक कार्यालयासाठी ५० लक्ष रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आल्याचे सांगितले.

केंद्रीय भू-संसाधन विभागाचे सचिव नरेंद्र भूषण यांच्या अध्यक्षतेखाली प्रस्तावित 'केंद्रीय नोंदणी विधेयक, २०२६' संदर्भात सर्व राज्यांच्या नोंदणी महानिरीक्षकांची व्हिडिओ कॉन्फरसिंगद्वारे आढावा बैठक घेण्यात आली. बैठकीला राज्याचे नोंदणी महानिरीक्षक तथा मुद्रांक नियंत्रक रविंद्र बिनवडे व उपमहानिरीक्षक राजेंद्र मुठे उपस्थित होते. या बैठकीत प्रस्तावित विधेयकातील तरतुदी, संभाव्य परिणाम आणि राज्यस्तरावरील सुधारणांबाबत सविस्तर चर्चा करून राज्यांचे अभिप्राय व सूचना जाणून घेण्यात आल्या.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली नोंदणी व मुद्रांक विभागाने महसूल वाढीसोबतच नागरिकांना अधिक सुलभ, पारदर्शक आणि कार्यक्षम सेवा देण्यासाठी विविध नाविन्यपूर्ण योजना यशस्वीपणे राबविले जात असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिल्यावर, सर्व राज्यांनी असे नावीन्यपूर्ण उपक्रम राबवावेत अशा सूचना करण्यात आल्या आहेत.

### आदर्श दुय्यम निबंधक कार्यालयाची रचना
- पुणे येथील कोथरूड भागात महाराष्ट्रातील पहिले कार्यालय सुरू
- पहिल्या टप्प्यात राज्यात आदर्श दुय्यम निबंधक कार्यालये
- मुंबई, ठाणे, पुणे, नागपूर, नाशिक आणि छत्रपती संभाजीनगर या सहा प्रमुख जिल्ह्यांमधील मुख्यालयांच्या ठिकाणी ३० नवीन आदर्श कार्यालये
- 'स्लॉट बुकिंग'द्वारे अत्यंत जलद दस्त नोंदणी.
- हाय-स्पीड स्कॅनिंगद्वारे त्वरित डिजिटल दस्त रेकॉर्ड.
- अत्याधुनिक बायोमॅट्रिकद्वारे जलद डिजिटल ओळख पडताळणी.
- एकाच दिवसात दस्त नोंदणी व पावती.
- कागदपत्रांची पूर्व तपासणी करून त्रुटींचे निवारण.
- हेल्पडेस्कद्वारे प्रवेशापासून अर्ज भरेपर्यंत वैयक्तिक मार्गदर्शन.
- डिजिटल टोकन आणि स्क्रीनवर थेट डिस्प्ले.
- आरामदायी सोफे असलेले सुसज्ज वातानुकूलित प्रतीक्षालय.
- सर्व नागरिकांना विनामूल्य हाय-स्पीड वाय-फाय सुविधा.
- स्वच्छ प्रसाधने, पिण्याचे पाणी आणि चहा-कॉफी.

"पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'डिजिटल इंडिया' संकल्पनेला गती देत, नागरिकांच्या सोयीसाठी भविष्यातही अधिक लोकाभिमुख आणि तंत्रज्ञानाधिष्ठित सेवा देण्यास आम्ही कटिबद्ध आहोत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने पुणे येथे सुरू झालेल्या मॉडेल कार्यालयाची दखल केंद्राने घेतली. यातूनच या कार्यालयाची उपयोगात लक्षात येते."
**- चंद्रशेखर बावनकुळे, महसूल मंत्री**

महाराष्ट्राच्या नोंदणी व मुद्रांक विभागाने सुरू केलेल्या 'एक जिल्हा, एक नोंदणी', 'ई-प्रमाण', पासपोर्ट कार्यालयांच्या धर्तीवर उभारलेली 'आदर्श कार्यालये' आणि 'ई-नोंदणी' यांसारख्या गतिमान उपक्रमांचे केंद्रीय सचिवांनी विशेष कौतुक केले.

# भारताच्या क्रीडापटूंनी केली ६ पदकांची कमाई

## भारतीय नेमबाजांनी केली कमाल



**वृत्तसंस्था, टोकियो**
आशियाई क्रीडा स्पर्धा २०२६ च्या दुसऱ्या दिवशी भारताने आपले पहिले मेडल जिंकून खाते उघडले. भारताला मिळालेले हे तिसरे पदक आहे. याआधीही पहिली दोन्ही पदके नेमबाजीत मिळवली होती. आता पुरुषांच्या १० मीटर एअर रायफल टीम इवेंटमध्ये भारताने सिल्वर मेडल जिंकले. भारताच्या पार्थ माने, रुद्रांक्ष पाटील आणि हिमांशू ढिल्लन यांनी मिळवून दिले.

चीनने १० मीटर एअर रायफल मेन्स टीम इवेंटमध्ये सुवर्ण पदक जिंकले. दरम्यान व्यक्तिगत स्पर्धेत भारताच्या हिमांशू ढिल्लनने रौप्य तर रुद्राक्ष पाटीलने कांस्य पदक पटकावले. यासोबतच महिला ट्रॅडिशनल ६० किलो ग्रॅम स्पर्धेत सुचिका तारियालने कांस्य पदक पटकावले.

दरम्यान, रुद्रांक्ष पाटील आणि हिमांशू ढिल्लन यांनी १० मीटर एअर रायफल मेन्स इवेंटच्या व्यक्तिगत गटात फायनलमध्ये क्वॉलिफाय केले. या स्पर्धेत हिमांशू ढिल्लन याने व्यक्तिगत रौप्य पदक पटकावले तर रुद्राक्ष पाटील याने कांस्य पदक पटकावले. तत्पूर्वी पार्थ माने इंडिविज्युअल फायनलच्या शर्यतीतून बाद झाला. त्यामुळे व्यक्तिगत गटात भारताला आणखी दोन पदकांचा लाभ झाला. यासोबतच महिला ट्रॅडिशनलमध्ये सुचिता तारियालने कांस्य पदक पटकावले. कालच्या दोन पदकानंतर आज दोन रौप्य आणि दोन कांस्य पदके मिळविल्याने भारताच्या पदकांची संख्या आता ६ झाली आहे.

संपादकीय लेखणीतून...

# दुष्काळमुक्ती आणि सुकामेवा

पाऊस गायब झाल्याने यंदा महाराष्ट्रावर दुष्काळाचे भीषण सावट पसरले आहे. शेतातील उभी खरीप पिके करपल्याने शेतकऱ्यांच्या डोळ्यातून महापूर वाहत आहे. सरकारने त्वरित दुष्काळ जाहीर करण्याची आणि आर्थिक मदतीची मागणी होत आहे. दुष्काळाचा सर्वाधिक फटका मराठवाड्याला बसला असताना या दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी नांदेडमध्ये एक उच्चस्तरीय बैठक झाली. या बैठकीत मंत्री, खासदार, आमदार आणि अधिकारी काजू-बदामासारख्या सुकामेव्यावर ताव मारताना दिसले. नेत्यांच्या या असंवेदनशीलतेमुळे राज्यभरातून तीव्र संताप व्यक्त होत आहे. हा प्रकार म्हणजे शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्यासारखेच आहे. नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात शनिवारी मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली. या बैठकीला राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर, नांदेडचे पालकमंत्री अतुल सावे, नांदेडचे खासदार रवींद्र चव्हाण, परभणीचे खासदार संजय जाधव, हिंगोलीचे खासदार नागेश पाटील-आष्टीकर, जालनाचे खासदार कल्याण काळे, राज्यसभा खासदार रामराव वडकुते, डॉ. अजित गोपछडे, आमदार प्रताप पाटील चिखलीकर, हेमंत पाटील, चंद्रकांत नवघरे, बाबुराव पाटील कोहळीकर, कैलास पाटील, अमर राजूरकर आणि अनेक आजी-माजी लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

या बैठकीत मराठवाड्यातील ८ जिल्ह्यांमधील पावसाची तूट, खरीप पिकांची स्थिती, पाणीटंचाई, चाऱ्याची समस्या, शेतकऱ्यांच्या मागण्या आणि संभाव्य उपाययोजना यावर चर्चा झाली. भाजपचे खासदार अशोक चव्हाण हे देखील ऑनलाईन पद्धतीने या बैठकीत सहभागी झाले होते. या बैठकीत गंभीर चर्चा सुरू असतानाच उपस्थित लोकप्रतिनिधींच्या टेबलावरील सुकामेव्याच्या थाळ्यांचे दृश्य कॅमेऱ्यात कैद झाले. परभणीचे खासदार संजय जाधव हे काजू-बदाम खाण्यात मश्गुल असल्याचे चित्रित झाले. हा प्रकार लक्षात येताच राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी तत्काळ संबंधित कर्मचाऱ्यांना सूचना देऊन काजू-बदामाच्या प्लेट टेबलावरून हटवण्यास सांगितले, पण तोपर्यंत या प्रकाराचे चित्रीकरण सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. बैठकीतून बाहेर आल्यावर शिंदे सेनेचे खासदार संजय जाधव यांनी वरील प्रकाराबाबत दिलेली प्रतिक्रिया संतापजनक होती.

ते पत्रकारांवरच चिडून म्हणाले, काजू-बदाम आम्ही टेबलावर ठेवले नव्हते. ही व्यवस्था प्रशासनाने केली होती. मी परभणीहून आलो, सकाळपासून नाश्ता केला नव्हता. समोर डिश ठेवल्या होत्या, त्यातील बदाम उचलून खाल्ला. एखाद्याला भूक लागली असेल आणि त्याने खाल्ले तर त्यात चूक काय? दुष्काळ आहे म्हणून कोणी काही खात नाही का? काजू-बदाम ठेवणा-यांना विचारले पाहिजे की, तुम्ही ते का ठेवले? त्यांना काही न विचारता आम्हालाच का प्रश्न विचारता? या प्रकरणात माझ्यावर टीका होत आहे, तर होऊ द्या. मी ती स्वीकारायला तयार आहे. माध्यमांनी त्यांची चिंता करू नये. तुम्ही दुष्काळावरच बोला. काजू-बदाम खाण्यावर बोलू नका! या असंवेदनशीलतेवरून विरोधकांनी सरकारला धारेवर धरले. उबाठाचे आमदार अंबादास दानवे म्हणाले, प्रशासकीय अधिकाऱ्यांचे हंटरने कातडे सोलून काढले पाहिजे. त्यांना काही संवेदनशीलता आहे की नाही? ज्या जिल्ह्यात बैठक होत आहे, त्याच जिल्ह्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या आहेत. बैठकांच्या नाटकांची गरज नाही, सरकारने सरळ दुष्काळ जाहीर केला पाहिजे.

पाणी, विजेचा अभाव आणि पिके जळून गेल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. कर्जाच्या विळख्यात सापडून तो आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलत आहे. अशा परिस्थितीत दुष्काळाच्या बैठकीत बसून काजू-बदाम चघळणे म्हणजे शेतकऱ्यांच्या दुःखाची थट्टा करण्यासारखे आहे. कर्नाटक सरकारने दुष्काळ जाहीर केला आहे. मात्र, महाराष्ट्र सरकार बैठकांचे सोपस्कार करत दुष्काळ जाहीर करण्यासाठी मुहूर्त शोधत आहे. शेतकरी नेते अजित नवले म्हणाले, शेतकऱ्यांना घास गिळत नाही, सत्ताधाऱ्यांना काजू-बदाम कसे गोड लागतात? या प्रकारावरून टीकेचा भडिमार झाल्याने सत्ताधाऱ्यांना सारवासारव करावी लागली.

# बहुभाषिकता आणि मराठीपण

झाडाझडती



विनोद देशमुख
ज्येष्ठ पत्रकार, नागपूर

एखाद्यामध्ये खोट काढायची किंवा त्याला विरोध करायचा किंवा त्याची बदनामी करायची असं एकदा ठरलं की मग कोणताही मुद्दा चालतो. बारा वर्षांपूर्वी नरेन्द्र मोदी पंतप्रधान झाले तेव्हापासून भाजपा-संघविरोधकांचं असंच काहीसं झालं आहे. मोदी स्वतः किंवा त्यांच्या पक्षाचा कोणताही नेता कुठेही काही बोलला की लगेच त्यावर तिरकस प्रतिक्रिया येणं सुरू होऊन जातं. समूह माध्यमातून अगदी खालच्या पातळीवर टीका केली जाते. इलेक्ट्रॉनिक माध्यमाच्या दांडक्यांसमोर सतत तोंड उचकटणारे काहीबाही बोलतात. प्रिंट मीडियावाले विनोदाच्या अंगानं टिंगलटवाळी करतात एवढाच काय तो या तिघांमध्ये फरक असतो.

१४ सप्टेंबरला हिन्दी दिवसानिमित्त मुंबईतील एका कार्यक्रमात केन्द्रीय गृहमंत्री अमित शहा महाराष्ट्राच्या संदर्भात भाषेबद्दल काही बोलले. लगेच त्यांच्यावर आगपाखड सुरू झाली. 'हे दोन गुजराती' ठरवून मराठीची खोड काढतात, असा जावईशोध पुन्हा एकदा लावण्यात आला. का? तर, "महाराष्ट्र हे देशातील एकमेव बहुभाषिक राज्य आहे" असा गौरव अमित शहांनी बोलताना केला. परंतु, मराठीचे तारणहार फक्त आपणच आहोत, असा ठेका घेतलेल्यांना हे वाक्य झोंबलं! अरे, महाराष्ट्र तर फक्त मराठीभाषिकांचा असताना शहा काय म्हणत आहेत? मराठीला दडपण्याचा हा डाव आहे. इतर राज्यांमध्ये जाऊन त्यांना बहुभाषिक म्हणून पाहा, असं आव्हानही देण्यात आलं. कारण, बहुभाषिक असण्यात महाराष्ट्राचा गौरव आहे, हेच ज्यांना उमगलं नाही, ते काय "मुंहमें आया बक दिया..." असंच बोलणार!

बहुभाषिक म्हणजे स्वतःच्या भाषेव्यतिरिक्त इतरही भारतीय भाषांना सामावून घेणारं राज्य. भारतात, हिन्दी प्रदेश सोडले तर, प्रत्येक राज्याची वेगळी भाषा आहे. त्या त्या राज्यात त्यांची मातृभाषा, इंग्रजी आणि कवचितच हिन्दीचं अत्यल्प प्रमाणात चलन आहे. याउलट, महाराष्ट्रात अनेक भाषांचा वावर आहे. इथं मराठीसह हिन्दीही मोठ्या प्रमाणावर बोलली जाते. शिवाय, उर्दू, सिंधी, गुजराती, कानडी, तेलुगू या भाषाही बऱ्यापैकी बोलल्या जातात. एकूण, महाराष्ट्र एकदोन नव्हे, सातआठ भाषांना जोपासत आहे. असं दुसरं राज्य देशात नाही, हे सत्यच शहांनी सांगितलं.

यावर संतापण्यासारखं काय आहे, मला तरी कळलेलं नाही. मातृभाषा सर्वांनाच येत असते. त्याव्यतिरिक्त आणखी एक किंवा अनेक भाषा आल्या तर नुकसान काय? महाराष्ट्रात तरी मराठी, इंग्रजी, हिन्दी या तीन भाषा जवळजवळ सर्वांनाच येतात. यात त्यांचा काही तोटा झाला का? उलट, लाभच झाला. वेगवेगळ्या संस्कृती, राहणीमान, खानपान आदींशी संबंध येऊन आपण समृद्ध झालो. याचा अर्थ आपण मराठीपण विसरलो, असा थोडीच होतो?

मराठीपण जपण्यात तशीही प्रत्येकाची व्यक्तिगत जबाबदारी मोठी असते. जागतिकीकरणाच्या या जमान्यात आपलीच आताची, नवीन पिढी किती मराठीपण पाळते, याचा आपणच विचार केला पाहिजे. त्यांचं वागणंबोलणं, वेशभूषा, खानपान यात आज पुरेसं मराठीपण दिसतं का? आधीची पिढी त्यासाठी आग्रही असते का? आग्रही असली तरी नवी पिढी जुमानते का? या प्रश्नांची उत्तरं शोधली तरच चित्र स्पष्ट होईल. यात, कडव्या मराठीपणाचा आव आणणाऱ्यांच्या उच्चभ्रू घरांमध्येच विपरीत दृश्य दिसण्याची शक्यता अधिक, हे आजचं वास्तव आहे.

उलट, बहुभाषिकताच फायद्याची ठरत असल्याची हजारो उदाहरणं दाखवता येतील. आपले लोक जगभरातील अनेक देशांमध्ये विविध क्षेत्रांमध्ये डंका वाजवत आहेत. त्यांचा वेळोवेळी अभिमान बाळगायचा आणि आपल्या राज्याला कोणी बहुभाषिक म्हटलं की, लगेच आरडाओरड सुरू करायची, हा उद्योग आता बंद झाला पाहिजे. भूदान चळवळीचे प्रणेते भौमर्षि विनोबा भावे यांना एकदोन नव्हे, चौदा भाषा अवगत होत्या. त्यांचं मराठी असणं यामुळे कधी बाधित झालं नाही. मग महाराष्ट्राचंच कसं काय होईल? काहीतरीच वेडाचार! वड्याचं तेल वांग्यावर!

# शाश्वत गणेशोत्सवाकडे एक आश्वासक पाऊल..

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, सामाजिक आणि आध्यात्मिक जडणघडणीत सार्वजनिक गणेशोत्सवाचे स्थान अत्यंत जिव्हाळ्याचे आणि अनन्यसाधारण आहे. समाज एकत्र यावा, प्रबोधन व्हावे आणि राष्ट्रीयत्वाची भावना वाढीस लागावी या उदात्त हेतूने लोकमान्य टिळकांनी सुरू केलेल्या या उत्सवाने आज एका अत्यंत भव्य आणि काहीशा अवाढव्य स्वरूपाचे रूप धारण केले आहे. उत्सवाचा उत्साह, ढोल-ताशांचा गजर, रोषणाई आणि भक्ती याबद्दल कोणाचेही दुमत असू शकत नाही; परंतु याच भक्तीच्या आडून आपण पर्यावरणाचा जो भयानक आणि न भरून येणारा ऱ्हास करत आहोत, तो अत्यंत चिंताजनक आहे. उत्सव आणि पर्यावरण यांचा समतोल राखणे ही आता केवळ काळाची नव्हे, तर आपल्या भावी पिढ्यांच्या अस्तित्वाची गरज बनली आहे. दुर्दैवाने, आजच्या काळात आपल्याकडे नागरी जाणिवेचा पूर्णपणे अभाव दिसून येतो. दहा दिवस अत्यंत श्रद्धेने, मनोभावे आणि भावपूर्ण वातावरणात गणरायाची पूजाअर्चा केल्यानंतर, विसर्जनाच्या दुसऱ्या दिवशी नदीकाठी, खाड्यांमध्ये किंवा समुद्राच्या किनाऱ्यांवर विस्कळीत आणि भग्न अवस्थेत पडलेल्या प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती पाहिल्या की आपली ही भक्ती किती वरवरची आणि दिखाऊ आहे, याची अत्यंत विदारक जाणीव होते.

प्लास्टर ऑफ पॅरिसचे निसर्गात कधीही सहजासहजी विघटन होत नाही. उलट, मूर्ती अधिक आकर्षक बनवण्यासाठी त्यात मिसळलेले विषारी रासायनिक रंग पाण्यातील ऑक्सिजनची पातळी कमी करतात, ज्यामुळे जलचरांसाठी आणि संपूर्ण पर्यावरणासाठी ते अत्यंत घातक ठरतात. पर्यावरणासाठी सर्वात मोठी डोकेदुखी ठरणाऱ्या या समस्येकडे आपला समाज अनेकदा सोयीस्कररीत्या डोळेझाक करतो. श्रद्धेच्या नावाखाली निसर्गाचा बळी देण्याची आणि प्रदूषणाला खतपाणी घालण्याची ही मानसिकता आता खऱ्या अर्थाने थांबायला हवी. याच अंधकारमय वास्तवात आशेचा, सकारात्मकतेचा आणि प्रत्यक्ष कृतीचा एक नवा किरण म्हणून 'बीच प्लीज' या संस्थेचे मल्हार कळंबे आणि 'पुष्पम' संस्थेचे डॉक्टर बिनिश देसाई यांच्या अनोख्या आणि अत्यंत कौतुकास्पद उपक्रमाकडे पाहावे लागते. केवळ समाजमाध्यमांवर चिंता व्यक्त करण्यापेक्षा किंवा व्यवस्थांना दोष देण्यापेक्षा प्रत्यक्ष कृतीवर भर देणाऱ्या या ध्येयवेड्या तरुणांनी एका मोठ्या पर्यावरणीय समस्येला संधीत बदलून समाजासमोर एक अत्यंत बोलका आणि अनुकरणीय आदर्श उभा केला आहे.

विसर्जनानंतर किनाऱ्यांवर आणि कचऱ्यात बेवारस पडलेल्या प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती अत्यंत आदराने गोळा करून, त्यांनी त्यावर शास्त्रीय पद्धतीने पुनर्प्रक्रिया करण्याचे अत्यंत कठीण शिवधनुष्य लिलया पेलले आहे.

या उपक्रमाची व्याप्ती केवळ कचरा गोळा करण्यापुरती किंवा किनारे स्वच्छ करण्यापुरती मर्यादित नाही, तर त्यांनी त्यातून एक अत्यंत विधायक, कल्पक आणि शाश्वत मार्ग शोधला आहे. कचऱ्यात जाणाऱ्या या मूर्तींचे त्यांनी केवळ विघटन न करता त्यांचे मूल्यवर्धन केले आहे आणि त्यातून समाजासाठी एक नवी आशा निर्माण केली आहे. आजवर तब्बल तीन हजार किलोहून अधिक कचऱ्यात जाणाऱ्या प्लास्टर ऑफ पॅरिसला या तरुणांनी नवसंजीवनी दिली आहे. या टाकाऊ वस्तूंवर प्रक्रिया करून त्यांनी त्यातून सातशे साठहून अधिक अभ्यासाची बाके आणि मेजे, तसेच इतर बाराहून अधिक प्रकारच्या दैनंदिन वापराच्या आणि उपयुक्त वस्तूंची निर्मिती केली आहे. ही केवळ आकडेवारी नाही, तर एका प्रबळ इच्छाशक्तीचे मूर्तिमंत उदाहरण आहे.

या उपक्रमाचा सर्वात सुंदर आणि हृदयस्पर्शी भाग म्हणजे, या पुनर्प्रक्रियेतून तयार झालेली अभ्यासाची बाके आणि मेजे समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल, वंचित आणि गरजू कुटुंबातील मुलांना मोफत वाटली जात आहेत. ज्या मुलांकडे अभ्यासासाठी साध्या प्राथमिक सोयीसुविधाही उपलब्ध नाहीत, ज्यांना जमिनीवर बसून अपुऱ्या प्रकाशात अभ्यास करावा लागतो, त्यांच्यासाठी ही बाके म्हणजे एक मोठे वरदान ठरत आहेत. एका बाजूला कचऱ्यात जाणाऱ्या आणि पर्यावरणाला घातक ठरणाऱ्या वस्तूला नवी, उपयुक्त ओळख मिळत आहे, तर दुसऱ्या बाजूला एका गरजू विद्यार्थ्याचा शिक्षणाचा आणि प्रगतीचा मार्ग सुकर होत आहे. टाकाऊतून टिकाऊ आणि कचऱ्यातून शिक्षणाची साधने निर्माण करण्याचा हा प्रवास खऱ्या अर्थाने परिवर्तनवादी, प्रेरणादायी आणि प्रत्येकाला अंतर्मुख करायला लावणारा आहे.

आगामी गणेशोत्सव दोन हजार सव्वीसच्या पार्श्वभूमीवर अशा प्रकारच्या पर्यावरणपूरक आणि हरित उपक्रमांची समाजाला नितांत आवश्यकता आहे. विघ्नहर्ता गणराया हा मुळात बुद्धीचा, विद्येचा आणि ज्ञानाचा देवता मानला जातो. त्याच्याच विसर्जित झालेल्या मूर्तींमधून आता तळागाळातील विद्यार्थ्यांच्या हाती अभ्यासाची साधने दिली जावीत, हा केवढा मोठा दैवी आणि अर्थपूर्ण योगायोग आहे! पर्यावरणासाठी अडथळा आणि विघ्न ठरणाऱ्या प्लास्टर ऑफ पॅरिसला समाजातील वंचित मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी आणि त्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी वापरण्याची ही संकल्पना खऱ्या अर्थाने विघ्नहर्त्याची मूळ शिकवण प्रत्यक्ष कृतीत उतरवणारी आहे. निसर्गाचे रक्षण आणि विद्यार्थ्यांचे शिक्षण या दोन्ही महत्त्वाच्या बाजू सांधणारा हा शाश्वत गणेशोत्सवाकडचा प्रवास आता केवळ एका उपक्रमापुरता मर्यादित न राहता, ती संपूर्ण महाराष्ट्राची एक व्यापक लोकचळवळ बनायला हवी. आपली भक्ती केवळ आरती आणि ढोल-ताशांच्या गजरापुरती मर्यादित न राहता, ती निसर्गाच्या संवर्धनातून, सामाजिक जाणिवेतून आणि वंचितांच्या कल्याणातून व्यक्त व्हायला हवी, तरच आपले उत्सव खऱ्या अर्थाने सार्थ आणि मंगलमय ठरतील.

थोडक्यात सांगायचे तर, विघ्नहर्त्याने आपल्याला संकटांवर मात करायला शिकवले आहे. आज आपल्या पर्यावरणावर आलेले प्रदूषण आणि विज्ञानाची कास सोडून कर्मकांडाकडे झुकण्याची प्रवृत्ती हे मोठे विघ्न आहे. हे विघ्न दूर करण्यासाठी शाडूची मूर्ती, ज्ञानाचा प्रसार आणि सामाजिक जबाबदारी हेच या शाश्वत गणेशोत्सवाचे आश्वासक पाऊल असेल.

- ९५६१५९४३०६

# शेफाली वर्माचे विक्रमी वादळ अन् चमारी अटापट्टूचा झंझावात, भारत-श्रीलंका सुवर्णपदकासाठी सज्ज

डॉ.दत्ता विघावे
क्रिकेट समिक्षक

जपानमधील निशिन येथील कोरोगी स्पोर्ट्स पार्कवर आशियाई क्रीडा स्पर्धा २०२६ च्या महिला क्रिकेट स्पर्धेत उपांत्य फेरीचा थरार रंगला. दोन्ही उपांत्य सामने एकापेक्षा एक ऐतिहासिक क्षणांचे साक्षीदार ठरले. एका बाजूला भारतीय सलामीवीर शेफाली वर्माने तुफानी शतकी खेळी करत बांगलादेशचा ११४ धावांनी धुव्वा उडवला, तर दुसऱ्या बाजूला श्रीलंकेची कर्णधार चमारी अटापट्टूने वादळी नाबाद ८३ धावा ठोकत पाकिस्तानचे सुवर्णस्वप्न धुळीस मिळवले. या दोन्ही दणदणीत विजयांसह भारत आणि श्रीलंकेने अंतिम फेरीत धडक मारून आपापले किमान रौप्य पदक निश्चित केले असून, आता २२ सप्टेंबर रोजी या दोन आशियाई महासत्तांमध्ये 'सुवर्णपदका'चा महासंग्राम रंगणार आहे.

**पाकिस्तानच्या स्वप्नांची रांगोळी: १७७ धावांचा डोंगर उभारूनही पदरी निराशा !**

पहिल्या उपांत्य सामन्यात पाकिस्तानचा संघ मोठ्या आत्मविश्वासाने आणि सुवर्णपदकावर डोळा ठेवून मैदानात उतरला होता. श्रीलंकेने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतल्यानंतर पाकिस्तानी फलंदाजांनी डावाची धुरा अतिशय समर्थपणे सांभाळली. सलामीवीर शवाल झुल्फिकारने संयमी फलंदाजी करत ५० चेंडूंत तीन चौकार आणि दोन षटकारांसह ५४ धावांची आश्वासक खेळी उभारली. त्यानंतर चौथ्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या आयेशा जफरने मैदानात उतरताच श्रीलंकन गोलंदाजांवर जोरदार प्रतिहल्ला चढवला. तिने केवळ ४० चेंडूंत नऊ चौकार आणि दोन षटकारांच्या जोरावर ७१ धावांची धडाकेबाज खेळी केली. अखेरच्या टप्प्यात कर्णधार फातिमा सनाने १२ चेंडूंत नाबाद २० धावा आणि सायरा जबीनने १४ चेंडूंत १७ धावांची उपयुक्त भर घातली. श्रीलंकेकडून सुगंधिका कुमारी, चमारी अटापट्टू आणि काव्या कविंदी यांनी प्रत्येकी एक बळी मिळवला. पाकिस्तानने २० षटकांत चार गडी गमावून १७७ धावांचा भक्कम टप्पा गाठला. महिला टी-२० क्रिकेटमध्ये बाद फेरीत १७८ धावांचे लक्ष्य पार करणे अत्यंत आव्हानात्मक मानले जाते. त्यामुळे पहिल्या डावानंतर पाकिस्तानचा अंतिम फेरीतील प्रवेश आणि सुवर्णपदकाची लढत जवळजवळ पक्की मानली जात होती.

**अटापट्टूचे वादळ अन् पाकिस्तानचे स्वप्नभंग**

मात्र, पाकिस्तानच्या या सुवर्णस्वप्नावर पाणी फेरण्याचे काम श्रीलंकेची कर्णधार चमारी अटापट्टूने केले. १७८ धावांचे कठीण आव्हान समोर असताना अटापट्टूने मैदानात अक्षरशः चौफेर फटकेबाजीचे तांडव सुरू केले. तिने सलामीवीर इमेशा दुलानीसोबत अवघ्या ४.४ षटकांत ३६ धावांची पायाभरणी केली, ज्यात दुलानीने २७ धावांचे योगदान दिले. दुलानी बाद झाल्यानंतर अटापट्टूने हसिनी परेरासोबत दुसऱ्या विकेटसाठी तब्बल ९५ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी रचून पाकिस्तानी गोलंदाजांचे मनोधैर्य खचवले. परेराने अवघ्या २६ चेंडूंत तीन चौकार आणि तीन षटकारांसह ४२ धावांची आक्रमक खेळी साकारली.

परेरा बाद झाल्यानंतरही अटापट्टूने आपली पकड ढिली होऊ दिली नाही. तिने मैदानावर पाकिस्तानी गोलंदाजीच्या चिंधड्या उडवत नाबाद ८३ धावांची अविस्मरणीय खेळी केली. तिच्या या झंझावातामुळे श्रीलंकेने अवघ्या १७.५ षटकांत दोन गडी गमावून १७८ धावांचे लक्ष्य लीलया गाठले. १७७ धावांची भक्कम धावसंख्या उभारूनही गोलंदाजांच्या निष्प्रभ माऱ्यामुळे आणि अटापट्टूच्या निर्दयी फटकेबाजीपुढे पाकिस्तानच्या स्वप्नांची अक्षरशः रांगोळी झाली. सुवर्णपदकाचे स्वप्न भंगल्यानंतर आता पाकिस्तानला केवळ कांस्यपदकावर समाधान मानावे लागणार आहे.

**शेफाली वर्माचे अभूतपूर्व शतक: बांगलादेशचा ११४ धावांनी धुव्वा**

दुसऱ्या उपांत्य फेरीत भारताने बांगलादेशविरुद्ध नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी स्वीकारली. या सामन्यात भारतीय सलामीवीर शेफाली वर्माने असा झंझावात निर्माण केला की बांगलादेशी गोलंदाजांना बचावासाठी जागाच उरली नाही.

डावाच्या सुरुवातीला स्मृती मानधनाने अवघ्या १९ चेंडूंत दोन षटकार आणि पाच चौकारांच्या मदतीने ३७ धावांची आतषबाजी करत पहिल्या सहा षटकांतच शेफालीसोबत ७२ धावांची सलामी दिली. त्यानंतर कर्णधार हरमनप्रीत कौरने ३३ चेंडूंत सहा चौकारांसह ४० धावा करत शेफालीसोबत तिसऱ्या विकेटसाठी ९४ धावांची भक्कम भागीदारी केली.

मैदानाच्या दुसऱ्या बाजूने शेफाली वर्माचे वादळ घोंगावत होते. तिने अवघ्या ४९ चेंडूंत नऊ षटकार आणि तीन चौकारांच्या मदतीने नाबाद १०० धावांची तुफानी खेळी उभारली. डावाच्या शेवटच्या चेंडूवर एक धाव घेत तिने आंतरराष्ट्रीय टी-२० कारकिर्दीतील पहिले शतक पूर्ण केले आणि आशियाई क्रीडा स्पर्धेच्या महिला क्रिकेट इतिहासात शतक झळकावणारी ती पहिलीच खेळाडू ठरली. भारताने २० षटकांत चार बाद १९५ धावांचा महाकाय डोंगर उभा केला.

**एकट्या शेफालीच्या धावाही बांगलादेशला भारी**

१९६ धावांच्या विशाल आव्हानाचा पाठलाग करताना भारतीय गोलंदाजांनी बांगलादेशला सुरुवातीपासूनच बॅकफूटवर ढकलले. बांगलादेशचा संपूर्ण संघ १५.४ षटकांत अवघ्या ८१ धावांवर गारद झाला. धक्कादायक बाब म्हणजे, बांगलादेशच्या सर्व अकरा फलंदाजांनी मिळून जेवढ्या धावा केल्या (८१), त्यापेक्षा एकट्या शेफाली वर्माने तब्बल १९ धावा जास्त (नाबाद १००) केल्या होत्या. बांगलादेशकडून केवळ दिलारा अख्तर (२७), सुल्ताना खातून (१२) आणि शर्मिन अख्तर (१०) यांनाच दोन आकडी धावसंख्या गाठता आली.

भारतीय गोलंदाजांनी प्रतिस्पर्ध्यांना डोके वर काढण्याची संधीच दिली नाही. नंदिनी शर्मा आणि दीप्ती शर्मा यांनी प्रत्येकी तीन बळी टिपले. श्री चरणीने दोन गडी बाद केले, तर क्रांती गौड आणि श्रेयांका पाटील यांनी प्रत्येकी एक बळी मिळवला. भारताने हा सामना ११४ धावांच्या प्रचंड फरकाने जिंकला. महिला आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमधील हा भारताचा तिसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा विजय ठरला.

**शेफाली वर्माने मोडले अनेक जागतिक विक्रम**

शेफालीच्या या एकाच खेळीने आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या पानांवर नवा इतिहास लिहिला:

एका वर्षात सर्वाधिक षटकार: २०२६ या एकाच वर्षात शेफालीच्या नावावर आता ३५ षटकार जमा झाले असून, तिने चमारी अटापट्टूचा २०२४ मधील ३२ षटकारांचा विश्वविक्रम मोडीत काढला.

एका डावात सर्वाधिक षटकार: एकाच आंतरराष्ट्रीय टी-२० डावात नऊ षटकार ठोकत तिने वेस्ट इंडिजच्या डिअँड्रा डॉटिन आणि हेली मॅथ्यूज यांच्या जागतिक विक्रमाशी बरोबरी साधली. भारतासाठी सर्वात जलद शतक: अवघ्या ४९ चेंडूंत शतक झळकावून तिने स्मृती मानधनाच्या २०१८ मधील सर्वात वेगवान भारतीय शतकाच्या विक्रमाची बरोबरी केली.

विपक्षी संघाच्या धावसंख्येपेक्षा जास्त धावा: विरोधी संघाच्या संपूर्ण धावसंख्येपेक्षा अधिक वैयक्तिक धावा करणाऱ्या भारतीय खेळाडूंच्या यादीत हरमनप्रीत कौर, मिताली राज आणि स्मृती मानधना यांच्या पंक्तीत शेफालीने आपले नाव कोरले.

**२२ सप्टेंबर: आशियाई 'सुवर्ण' महामुकाबला**

उपांत्य फेरीच्या या दोन धमाकेदार निकालानंतर अंतिम समीकरणांची अधिकृत आखणी झाली आहे. बांगलादेशविरुद्ध सलग दहावा आंतरराष्ट्रीय विजय नोंदवत भारतीय महिला संघाने दिमाखात अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. आता २२ सप्टेंबर रोजी सुवर्णपदकासाठी भारताचा सामना चमारी अटापट्टूच्या नेतृत्वाखालील लढाऊ श्रीलंकेविरुद्ध होणार आहे. तर त्याच दिवशी कांस्यपदकासाठी पाकिस्तान आणि बांगलादेश हे दोन पराभूत संघ एकमेकांशी भिडतील. आशियाई क्रीडा स्पर्धा २०२६ च्या सुवर्णपदकावर भारत नाव कोरणार की श्रीलंका बाजी मारणार, याकडे संपूर्ण क्रीडाविश्वाचे लक्ष लागले आहे.

- ९०९६३७२०८२

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

दैनिक सिंहवाणी वृत्त



# बल्लारशाह रेल्वे स्थानकाचा कायापालट वेगाने : पुनर्विकासाचे ५० टक्के काम पूर्ण

**दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर**
**(धनंजय पांढरे)**

अमृत भारत स्थानक योजनेअंतर्गत बल्लारशाह रेल्वे स्थानकाच्या पुनर्विकासाचे काम आता वेगाने सुरू असून आतापर्यंत सुमारे ५० टक्के काम पूर्ण झाले आहे. स्थानकाचा मुख्य प्रवेशमार्ग, रस्ते, नाल्या, संरक्षक भिंत, फलाट, प्रवासी निवास, तिकीट कार्यालय, वाहनतळ आणि पादचारी पुलासह विविध कामांना गती देण्यात आली आहे. उर्वरित कामे जानेवारी २०२७ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट रेल्वे प्रशासनाने ठेवले आहे. माजी मंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या पाठपुराव्यामुळे बल्लारशाह स्थानकाच्या



पुनर्विकासाच्या कामांना गती मिळाली आहे. मुनगंटीवार यांनी यापूर्वी स्थानकाला भेट देऊन कामांची पाहणी केली होती.

कामाची संथ गती लक्षात घेता त्यांनी रेल्वे प्रशासनाकडे नाराजी व्यक्त करून कामे निर्धारित वेळेत पूर्ण करण्याची मागणी केली होती. रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव तसेच मंडल रेल्वे व्यवस्थापक विनायक गर्ग यांच्यासोबतच्या चर्चेतही त्यांनी हा विषय मांडला होता.

या पार्श्वभूमीवर मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाचे अपर मंडल रेल्वे व्यवस्थापक अमोल कुमार पिंगळे यांनी कामांच्या प्रगतीबाबत अहवाल दिला आहे. दरम्यान, मध्य रेल्वेच्या विभागीय रेल्वे सल्लागार समितीचे सदस्य तथा स्पॉट चेक समितीचे सदस्य अजय दुबे यांनी बल्लारशाह स्थानकाला भेट देऊन सुरू असलेल्या कामांची प्रत्यक्ष पाहणी केली.

स्थानकाच्या मुख्य प्रवेशमार्गाच्या दिशेने ५९० मीटर रस्त्याचे बांधकाम पूर्ण झाले स्थानक परिसराच्या विकासासाठी रेल्वे निवासस्थानांचे पुनर्व्यवस्थापन करण्यात आले असून चार आरबी-३ आणि सहा आरबी-२ प्रकारच्या निवासस्थानांचे बांधकाम पूर्ण झाले आहे.

प्रवाशांच्या सोयीसाठी फलाटांवर आठ नवीन छत उभारण्यात आले आहेत. फलाट क्रमांक ४ मध्ये चेकर्ड फरशीने नूतनीकरण करण्यात आले आहे. फलाट क्रमांक ४ आणि ५ वरील पृष्ठभागाचे कोटा दगडाने नूतनीकरण करण्यात आले आहे. फलाट क्रमांक १ वरील जुनी स्वच्छतागृहे तसेच विद्यमान तिकीट कार्यालयातील स्वच्छतागृहांचे नूतनीकरण पूर्ण झाले आहे. नवीन तिकीट कार्यालयाचे बांधकाम तथा नवीन वाहनतळातील पीसीसीचे काम पूर्ण झाले आहे. १२ मीटर रुंदीच्या पादचारी पुलासाठी पायाभूत कामे स्थानकावरील तसेच दिशादर्शक फलक आणि स्थानकाच्या नावाचे फलक बसविण्याचे कामही पूर्ण झाले आहे.

**गोल पुलियाकडूनही मिळणार प्रवेश**

बल्लारशाह स्थानकाच्या पुनर्विकासातील महत्त्वाचा भाग म्हणजे रेल्वे चौकासोबतच गोल पुलियाच्या दिशेने प्रवाशांसाठी आणखी एक प्रवेशमार्ग उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यामुळे सध्याच्या मुख्य प्रवेशमार्गावरील प्रवासी व वाहनांची गर्दी कमी होण्यास मदत होणार आहे. नव्या प्रवेशमार्गामुळे स्थानकात ये-जा करणाऱ्या प्रवाशांना अधिक सुलभ सुविधा उपलब्ध होणार आहेत.

बल्लारशाह स्थानकाच्या पुनर्विकासाचे आतापर्यंत सुमारे ५० टक्के काम पूर्ण झाले असून उर्वरित कामांना गती देण्यात आली आहे. जानेवारी २०२७ पर्यंत संपूर्ण पुनर्विकासाचे काम पूर्ण करण्याचे नियोजन रेल्वे प्रशासनाने केले आहे. त्यामुळे येत्या काळात बल्लारशाह रेल्वे स्थानक आधुनिक स्वरूपात प्रवाशांच्या सेवेत येण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

## नागपूर शहरात नवीन सह दुय्यम निबंधक कार्यालय क्रमांक ११ सुरू

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

नागपूर जिल्ह्यामध्ये २२ सप्टेंबर २०२६ पासून नवीन सह दुय्यम निबंधक कार्यालय क्रमांक ११ (मॉडेल एसआरओ कार्यालय) सुरू करण्यात येत आहे. या शासकीय कार्यालयाचा सर्व नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन सह जिल्हा निबंधक कार्यालयाने केले आहे. हे कार्यालय पहिला माळा, क्रॉसविंड बिल्डिंग, प्लॉट क्रमांक ३८०, कॉर्पोरेशन हाऊस क्रमांक १०१९, नॉर्थ अंबाझरी रोड, धरमपेठजवळ, गांधीनगर, नागपूर (पिन कोड ४४००१०) येथे कार्यान्वित राहील.

**कार्यालयीन कामकाजाची वेळ**

सदर शासकीय कार्यालय सोमवार ते शुक्रवार या कार्यालयीन दिवसांत सकाळी ९.४५ ते सायंकाळी ६.१५ या वेळेत सुरू राहील. शनिवार आणि रविवार या साप्ताहिक सुट्टीच्या दिवशी हे कार्यालय बंद राहील.

## मौदा येथे सेवा संकल्प अभियान अंतर्गत आशीर्वादाचा दिवा प्रेरणादायी कार्यक्रम



**दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा**

भारत देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७६ व्या वाढदिवसानिमित्त सेवा संकल्प अभियानांतर्गत 'आशीवार्दाचा दिवा' हा प्रेरणादायी कार्यक्रम वृंदावन लॉनच्या बाजूला, मौद्याचा महाराजा गणेश उत्सव मंडळ, मौदा येथे भारतीय जनता पार्टी, भारतीय जनता युवा मोर्चा आणि भाजपा महिला आघाडी च्या माध्यमातून उत्साहात आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाला टेकचंद सावरकर माजी आमदार, राजाभाऊ तिडके नगराध्यक्ष नगरपंचायत मौदा,निशा सावरकर माजी अध्यक्ष जि. प. नागपूर, नरेश मोटघरे उपाध्यक्ष जिल्हा ग्रामीण,रमेश कुंभलकर अध्यक्ष भाजपा शहर, मोरेश्वर सोरते नगरसेवक न. प. मौदा,शरद भोयर भाजपा नेते,उमेश गभने नगरसेवक, न. प. मौदा,राहुल पोटभरे नगरसेवक न. प. मौदा, मुन्नाभाऊ चलसाणी माजी नगरसेवक, शिवराज माथुरकर महामंत्री भाजयुमो नागपूर जिल्हा ग्रामीण,विरेंद्र पायतोडे उपाध्यक्ष भाजयुमो नागपूर जिल्हा ग्रामीण,कल्पना मानकर अध्यक्ष भाजपा महिला आघाडी,शालिनी कुहीकर माजी नगरसेवक चंद्रशेखर सावरकर,विजय हटवार, मोरेश्वर राजगिरे,संजय मदणकर, धनराज चाफले पृथ्वीराज गुजर,चंद्रकांत पोटभरे, सौरभ खरवडे, सुरज पराते,अमेय चेडगे,अभिजित आंबूलकर,भूपेश सावरकर सह भाजपा, भाजयुमो व भाजपा महिला आघाडी चे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सेवा हाच संकल्प.... राष्ट्रनिर्माण हाच ध्यास अशा घोषणा देत सेवा, समर्पण आणि राष्ट्रनिमार्णाचा संकल्प घेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आले.

## १०१ दीपांनी उजळला ग्रामपंचायत परिसर, सरपंच विशाल सेलोकर यांच्या पुढाकारातून 'आशीवार्दाचा दिवा' उपक्रम

**दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा**

देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७६ व्या वाढदिवसानिमित्त सेवा संकल्प अभियानांतर्गत 'आशीवार्दाचा दिवा' हा प्रेरणादायी उपक्रम ग्रामपंचायत बोरी (घिवारी) येथे उत्साहात संपन्न झाला. ग्रामपंचायत कार्यालय परिसरात सरपंच विशाल मदन सेलोकर यांच्या पुढाकारातून १०१ दीप प्रज्वलित करून पंतप्रधान नरेंद्र मोदी साहेबांना ग्रामस्थांच्या वतीने वाढदिवसाच्या शुभेच्छा व आशीर्वाद देण्यात आले. या सुंदर आणि भावनिक उपक्रमात गावातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.



'आशीर्वादाचा दिवा' हा केवळ दीपप्रज्वलनाचा कार्यक्रम नसून देशसेवेप्रती कृतज्ञता, सेवाभाव आणि विकसित भारताच्या संकल्पाला बळ देणारा उपक्रम म्हणून ग्रामस्थांनी तो उत्साहाने साजरा केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही 'आशीर्वाद का दिया' या उपक्रमाला स्नेहाची विशेष अभिव्यक्ती आणि भारताची अधिक समर्पणाने सेवा करण्याचा संकल्प दृढ करणारा भाव असल्याचे म्हटले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाच्या विकासाला, जनसहभागाला आणि सर्वसामान्यांच्या सक्षमीकरणाला महत्त्व देत विविध क्षेत्रांत काम पुढे नेले जात असल्याचे त्यांच्या अधिकृत निवेदनांमध्ये नमूद करण्यात आले आहे. विकसित भारत घडविण्यासाठी जनतेने एकत्रितपणे योगदान देण्याचे आवाहनही त्यांनी केले आहे.

गाव छोटं असलं तरी देशाच्या नेतृत्वाविषयीचा आदर आणि विकासाच्या संकल्पाची भावना मोठी आहे, हे १०१ दीपांच्या माध्यमातून बोरी (घिवारी) ग्रामस्थांनी दाखवून दिले.

या उपक्रमाचे विशेष कौतुक करताना ग्रामस्थांनी सांगितले की, सरपंच विशाल सेलोकर यांच्या संकल्पनेतून आणि पुढाकारातून गावात सातत्याने नाविन्यपूर्ण, सामाजिक व जनहिताचे उपक्रम राबविले जात आहेत. गावातील प्रत्येक नागरिकाला सोबत घेऊन कार्यक्रम आयोजित करण्याची त्यांची कार्यपद्धती या उपक्रमातून पुन्हा एकदा दिसून आली.

यावेळी ग्रामस्थ, महिला, युवक, ज्येष्ठ नागरिक तसेच ग्रामपंचायत पदाधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. १०१ दीपांची ज्योत, सेवाभावाची वाट आणि विकसित भारताचा संकल्प! या प्रेरणादायी वातावरणात पंतप्रधान नरेंद्र मोदी साहेबांना वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा देत देशसेवेचा हा संकल्प अधिक बळकट करण्याचा संदेश देण्यात आला.

## "श्रद्धा सै ही आत्मकल्याण"

### चातुर्मासिक प्रवचनमाला स्थळी स्वाधवी सुरुचीश्रीजी महासती यांनी केले अनुयायांना मार्गदर्शन

**दै. सिंहवाणी वृत्त, पारशिवनी**

आज्ञानुवती शाषण दिपीका पुज्य श्री सुरुचीश्रीजी म.सा.श्री आगमश्री म.सा. सिद्धीश्रीजी म सा. यांच्या नेतृत्वा मध्ये श्री. वर्धमान स्था.जैन श्रावक संध पारशिवनी येथे आयोजित चातुर्मासिक प्रवचनमाला चे नियोजन करण्यात आले आहे. यावेळी चातुर्मासिक प्रवचनमाला उपस्थित अनुयायांना संबोधित करताना स्वाधवी सुरुचीश्रीजी महासती यांनी" श्रद्धा हि आत्म कल्याणाच्या मार्ग असुन व्यक्ती सहनशील,विवेकशील,होऊन सयमीत जिवंत व्यतीत करु शकतो असा संदेश देत उपस्थित अनुयायांना मार्गदर्शन केले.



मनुष्य निर्माण होत असताना चार गुण ज्यामध्ये अनुवांशिक गुण, सुसंस्कार,वातावरण आणी कर्तुत्वाचे फळ या हि चार वैशिष्ट्याची आवश्यकता असते. आत्म कल्याणाच्या मार्ग निवड करताना त्यात ज्ञान, ध्यान, दर्शन आणी त्याग तपस्या या चार गोष्टी आवश्यक आहेत. त्याग आणी तपस्या केल्यास जिवंत उज्वल सार्थक होण्यास मदत होते. हि वचने पाळत पारशिवनी येथील अनुयायी श्रद्धा बोथरा, यांचे मासक्षमण (३०) दिवशीय निरंकार उपवास,सौ.हिना सरमैया यांनी (११ उपवास),विजय खिलोसिया (११उपवास) , प्रांजल खिलोसिया (११ उपवास),सौ पियु कटारीया (११उपवास),सौ.रेणु बोथरा (९ उपवास),पुजा खिलोसिया (९उपवास), चंदाबाई रांका (८ उपवास), चमक रांका (८उपवास) ,अमित रांका (८ उपवास)निकिता रांका (८उपवास) सरस्वती रांका ( ५ उपवास), आणी ११ वर्षीय शौर्य कोचर ने ३ दिवस अखंड निरंकार उपवास करुन तपश्चर्या केली.

स्थानिक महावीर भवन येथे तपश्चर्या करणार्या अनुयायांना अनुमोदना कार्यक्रमात नागपुर येथील श्री .संध आधारस्तंभ राजेंद्रप्रसाद जी बैद यांच्या प्रमुख उपस्थितीत श्री संघ प्रमुख मार्गदर्शक प्रकाशचंद बोथरा, भानुभाई खिलोसिया,चंदन बोथरा, सह समाज बांधव मोठ्या संख्येने या वेळी उपस्थित होते.

# परिवहन मंत्री दिव्यांगांकडे लक्ष देतील का?

## एसटी बसमधील आरक्षित आसनांचा दिव्यांगांना प्रत्यक्ष लाभ देण्याची मागणी

**दै. सिंहवाणी वृत्त, काटोल**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) बसमधून दररोज मोठ्या संख्येने नागरिक प्रवास करतात. प्रवाशांच्या सुविधेसाठी एसटी बसमध्ये दिव्यांग व अपंग व्यक्तींसाठी आरक्षित आसनांची व्यवस्था करण्यात आली आहे. मात्र, या आरक्षित आसनांचा प्रत्यक्ष लाभ दिव्यांग प्रवाशांना मिळत नसल्याच्या तक्रारी समोर येत आहेत.



दिव्यांगांसाठी राखीव असलेल्या आसनांवर इतर प्रवासी बसत असल्याने दिव्यांग व्यक्तींना अनेकदा बसमध्ये उभे राहून प्रवास करावा लागत असल्याचे दिसून येते. दिव्यांग प्रवाशांना प्रवासासाठी सवलतीचे तिकीट दिले जाते; मात्र त्यांच्या आरक्षित आसनाचा हक्क मिळवून देण्यासाठी वाहकांकडून आवश्यक सहकार्य मिळत नसल्याची तक्रार करण्यात येत आहे.

दिव्यांग व्यक्तींना शारीरिक अडचणींचा सामना करावा लागत असल्याने त्यांच्यासाठी राखीव असलेल्या आसनांचा लाभ प्राधान्याने त्यांनाच मिळणे आवश्यक आहे. आरक्षित आसनावर इतर प्रवासी बसले असल्यास एसटी वाहकांनी तत्काळ दखल घेऊन दिव्यांग प्रवाशाला आसन उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

या गंभीर प्रश्नाकडे महाराष्ट्राचे परिवहन मंत्री, परिवहन विभागाचे अधिकारी, परिवहन निरीक्षक तसेच संबंधित एसटी डेपो व्यवस्थापक यांनी तातडीने लक्ष देऊन सर्व वाहक व चालकांना स्पष्ट सूचना द्याव्यात. तसेच एसटी बसमध्ये दिव्यांगांसाठी आरक्षित आसनांची माहिती दर्शविणारे फलक लावून त्याबाबत प्रवाशांमध्ये जनजागृती करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

दिव्यांगांच्या हक्काच्या आरक्षित आसनांचा प्रत्यक्ष लाभ त्यांना मिळणार की नाही? परिवहन विभाग याबाबत ठोस पाऊल उचलणार का? असा प्रश्न दिव्यांग प्रवाशांकडून उपस्थित केला जात आहे.

दिव्यांग व अपंग प्रवाशांना प्रवासादरम्यान उभे राहण्याची वेळ येऊ नये आणि त्यांना आरक्षित आसनाचा योग्य लाभ मिळावा, यासाठी परिवहन विभागाने तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी समता सैनिक दल, दीक्षाभूमी नागपूर ग्रामीण (०१), महाराष्ट्र तसेच दिव्यांग व अपंग संघटनेच्या वतीने प्रशासनाकडे करण्यात आली आहे.

**थोडक्यात**

## अचानक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ डोंबिवली पश्चिमच्यावतीने मोफत नेत्र चिकित्सक शिबीर



**दै. सिंहवाणी वृत्त, डोंबिवली**

अचानक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ डोंबिवली पश्चिम यांच्या वतीने भाजप महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त गणेश मंडपामध्ये रविवार २० सप्टेंबर रोजी मोफत नेत्र चिकित्सक शिबीर आयोजित करण्यात आले होते. दरवर्षी सामाजिक शैक्षणिक उपक्रमावर भर दिला जातो असे पदाधिकारी यांनी सांगितले. तर या मंडळाशी आपले नाते दहा-पंधरा वर्षे असून हे मंडळ विविध सामाजिक उपक्रम व शैक्षणिक उपक्रम राबवत असतात.

गेल्या वर्षी सुद्धा पन्नासच्या वरती नागरिकांनी वैद्यकीय शिबिरात भाग घेतला होता तर या वेळी भाजप महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त मोफत नेत्र चिकित्स्क शिबिराचे आयोजन केले असून नागरिकांचा त्याला चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे नगरसेवक नंदु शांताराम म्हात्रे यांनी सांगितले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मंडळाचे अध्यक्ष निखिल शेलार उपाध्यक्ष सतीश सोनवणे खजिनदार राजू म्हात्रे सचिव संजय पाटील, सल्लगार श्रीकांत बिरमोळे, सदानंद म्हात्रे पदाधिकारी समृद्ध म्हात्रे, अथर्व म्हात्रे, स्वीकृत जोशी, विशाल सोनवणे, साईल चौधरी दर्शन आणि स्वप्नील परमार यांनी मेहनत घेतली तर हे शिबीर परेल येथील केबी हाजी बच्चुभाई चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने डॉ. रेश्मा आणि त्यांची टीम यांच्या दक्षतेखाली राबविण्यात आला.

## जि. प हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय

### कोदामेंढी येथे आज पालक सभा, शालेय व्यवस्थापन समितीसह विविध समित्यांचे होणार पुनर्गठण

**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

जि. प हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय कोदामेंढी येथे शिकत असलेल्या ५ ते १२ वर्गातील विद्यार्थ्यांच्या पालकांसाठी, उद्या मंगळवार (ता. २२ सप्टेंबर) ला सकाळी ११ वाजता पालक सभेचे आयोजन करण्यात आले. या पालक सभेत शाळा व्यवस्थापन समितीचे पुनर्गठण, सखी सावित्री समितीचे पुनर्गठण, महिला तक्रार निवारण समितीचे पुनर्गठण, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर चर्चा व वेळेवर येणारे इतर विषयावर चर्चा होणार आहे. तरी या पालक सभेला शाळेत शिकत असलेल्या सर्व विद्यार्थ्यांच्या पालकांनी उपस्थित राहण्याचे आव्हान शाळेचे मुख्याध्यापक सुरेश ढोके यांनी सोशल मीडियाच्या विविध ग्रुपवर तसे पत्र टाकून केले आहे.

## तारसा-माथणी जिल्हा परिषद क्षेत्र अंतर्गत येत असलेल्या गावांमध्ये समाजभावनाचे भूमिपूजन




**दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा**

शनिवार (ता.१९ सप्टेंबर) ला महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या स्थानिक विकास निधी अंतर्गत तारसा माथनी जि प क्षेत्र अंतर्गत येणाऱ्या सिंगोरी, सावरगाव व कोपरा येथे मंजूर समाज भवन कामांचे भूमिपूजन उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. गावागावातील नागरिकांसाठी उपयुक्त ठरणाऱ्या या विकासकामांच्या माध्यमातून सामाजिक सुविधा आणि गावाच्या विकासाला नवी दिशा मिळणार आहे. याप्रसंगी टेकचंद सावरकर माजी आमदार कामठी-मौदा विधानसभा क्षेत्र,राजा तिडके नगराध्यक्ष नगर पंचायत मौदा,नरेश मोटघरे उपाध्यक्ष भाजपा जिल्हा ग्रामीण,कीर्ति पायतोडे माजी पं. स. सदस्य, खुशाल तांबडे उपाध्यक्ष, खरेदी-विक्री संघ मौदा,शिवराज माथुरकर महामंत्री भाजयुमो नागपूर जिल्हा ग्रामीण (रामटेक), विरेंद्र पायतोडे उपाध्यक्ष भाजयुमो नागपूर जिल्हा ग्रामीण (रामटेक), मंगेश तिघरे सदस्य, दक्षता समिती मौदा, बंटी हटवार अध्यक्ष भाजयुमो मौदा शहर, अजाब टेकाम माजी सरपंच गट ग्रामपंचायत नरसाळा,सचिन राऊत माजी उपसरपंच, गट ग्रामपंचायत नरसाळा,यांच्यासह अध्यक्ष, बूथप्रमुख, भाजपा-भाजयुमो पदाधिकारी, कार्यकर्ते व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## धनी येथील श्रीगणेश मंदिरात श्रीगणेश उत्सव

**दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा**

खात - रेवराल जिल्हा परिषद क्षेत्र अंतर्गत येणाऱ्या धनी येथे



बाल गणेश उत्सव मंडळातर्फे दरवर्षीप्रमाणे यंदाही विविध सांस्कृतिक व धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करून श्रीगणेश मंदिरात श्री गणेश उत्सव सुरू आहे. उत्सवाच्या यशस्वीतेसाठी बाल गणेश उत्सव मंडळ धनीचे पदाधिकारी आकाश नेवारे, नितीन वडीचार, महेश गुडेवार,नरेंद्र नेवारे,चुन्नीलाल झाडे, संतोष नागपूरे, पुना बुराडे,सागर मडावी, सौरभ मडावी,अमित कावळे,सचिन हरकंडे सोहम माटे, मनोज किनेकार, राजेन सारवे, भावेश मडावी,प्रणय मडावी, शुभम टेकाम,विक्की टांगले, विलास कावळे, अरविंद मडावी, अंकित कूर्वे परिश्रम घेत असून समस्त ग्रामवासी सहकार्य करत आहे.

## सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरविणाऱ्या ४१९ प्रकरणांची नोंद

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर महानगरपालिकेच्या उपद्रव शोध पथकाद्वारे सार्वजनिक ठिकाणी लघुशंका करणाऱ्यांवर, कचरा फेकणाऱ्यांवर, थुंकणाऱ्यांवर, ७९ मायक्रॉन पेक्षा कमी प्लास्टिक पिशवीचा वापर करणाऱ्यांवर अधिक कठोर कारवाई केली जात आहे. रविवार ते शनिवार (ता.१३ सप्टेंबर ते १९ सप्टेंबर) शोध पथकाने ४१९ प्रकरणांची नोंद करून २,२६,६०० रुपयाचा दंड वसूल केला.

दैनिक सिंहवाणी वृत्त


थोडक्यात

## सार्वजनिक गणेश उत्सव मंडळाला मान्यवरांची सदिच्छा भेट

### भक्तिमय वातावरणात गणरायाचे दर्शन घेत मंडळाच्या उपक्रमांचे केले कौतुक



**दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे-सालेकसा**

सालेकसा शहरातील नगर पंचायतजवळ, बाजार चौक येथे सुरू असलेल्या सार्वजनिक गणेश उत्सव मंडळाला सोमवार, दि. २१ सप्टेंबर २०२६ रोजी मान्यवरांनी सदिच्छा भेट देऊन श्री गणरायाचे दर्शन घेतले. यावेळी खासदार प्रतिनिधी दुस्यंन्त किरसान तसेच नगर पंचायत अध्यक्ष विजय फुंडे यांनी मंडळाला भेट देत गणरायाचे दर्शन घेतले. मंडळाच्या वतीने उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. गणेशोत्सवाच्या माध्यमातून धार्मिक वातावरणासोबतच सामाजिक एकोपा व बंधुभाव वाढविण्यासाठी मंडळाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचे यावेळी कौतुक करण्यात आले.

यावेळी सार्वजनिक गणेश उत्सव मंडळाचे अध्यक्ष राजु फुंडे, अशोक कुमार कटरे, आकाश श्रीवास्तव, निक्की श्रीवास्तव, राजु रोकडे, विद्याकुमार बहेकार, विवेक नागपुरे, हेमराज वराहडे, बबलू शिवनकर यांच्यासह महिला मंडळाच्या उषाताई वराहडे, माधुरीताई फुंडे, हत्तीमारेताई, नागपुरेताई, वंदनाताई कटरे आदी उपस्थित होते. गणेशोत्सवाच्या निमित्ताने मंडळ परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून, भाविकांकडून श्री गणरायाचे दर्शन घेण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली जात आहे. मंडळाच्या वतीने भाविकांसाठी विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

## नागपूर पूर्व प्रादेशिक परिवहन कार्यालयात दुचाकींच्या नोंदणी क्रमांकांची नवीन मालिका

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, नागपूर (पूर्व) येथे दुचाकी वाहनांची 'MH49-DB' ही नोंदणी क्रमांकांची मालिका संपत आल्याने दुचाकींसाठी 'MH49-DC' ही नवीन मालिका २३ सप्टेंबर २०२६ पासून सुरू करण्यात येत आहे. या मालिकेतून वाहनधारकांना पसंतीचा किंवा आकर्षक नोंदणी क्रमांक आरक्षित करता येईल, अशी माहिती सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी राहुल भगत यांनी दिली.

पसंतीचा नोंदणी क्रमांक हवा असणाऱ्या वाहनधारकांनी विहित नमुन्यातील अर्जासोबत पत्त्याचा पुरावा, छायाचित्र, ओळखपत्र, पॅनकार्ड आणि उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, नागपूर (पूर्व) यांच्या नावे काढलेला राष्ट्रीयीकृत बँकेचा शुल्काचा धनाकर्ष जोडून कार्यालयात सादर करावयाचा आहे. हे अर्ज २३ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी २.३० या वेळेत कार्यालयातील नवीन वाहन नोंदणी विभागात स्वतः हजर राहून सादर करावे लागतील. दुपारी २.३० नंतर कोणतेही अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. तसेच अर्जदाराने स्वतःच कार्यालयात उपस्थित राहून अर्ज सादर करणे बंधनकारक असून, इतर कोणत्याही व्यक्तीमार्फत सादर केलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# लालपरी सालेभट्टी पर्यंतच का?

### नांदपर्यंत बससेवा सुरू करा, उमरेड आगाराला शिवसेनेचा इशारा



**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**

उमरेड आगाराची बस सालेभट्टीपर्यंत धावते; मग नांदला जाण्यासाठी चाके अचानक का थांबतात? नांद, भगवानपूर, सायगाव आणि खरकाडा परिसरातील विद्यार्थ्यांनी आणि नागरिकांनी बससेवेअभावी खासगी वाहनांचा आधार घ्यायचा, त्यासाठी पदरमोड करायची आणि आगाराने मात्र सालेभट्टीवरच प्रवास संपवायचा, असा प्रकार किती दिवस चालणार? असा सवाल उपस्थित करत शिवसेनेच्या उमरेड विधानसभा महिला संघटिका प्रमुख इंजि. सपना राजेंद्र मेश्राम यांनी उमरेड आगार प्रशासनाला धारेवर धरले आहे. उमरेड ते नांद मार्गावर बससेवा सालेभट्टीपर्यंत सुरू आहे. मात्र सालेभट्टीनंतर बस नांदपर्यंत न नेता पुन्हा उमरेडकडे परतविली जाते. त्यामुळे नांद येथील शाळकरी विद्यार्थ्यांसह परिसरातील नागरिकांची मोठी गैरसोय होत असल्याचे मेश्राम यांनी निवेदनात म्हटले आहे.

शिक्षणासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांना बस नाही, पण खासगी वाहनांचा खर्च मात्र नशिबी! आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील विद्यार्थी आणि हातमजूर नागरिकांना हा अतिरिक्त वाहतूक खर्च परवडणारा नसल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था ही जनतेच्या सोयीसाठी असते; मग नांदच्या जनतेला तिच्यापासून वंचित का ठेवले जात आहे, असा सवालही उपस्थित करण्यात आला आहे.

भगवानपूर, सायगाव, खरकाडा आणि नांद या गावांतील विद्यार्थी व नागरिकांसाठी सालेभट्टीपर्यंत धावणारी बस भगवानपूरमार्गे थेट नांदपर्यंत नेण्याची मागणी करण्यात आली आहे. काही किलोमीटरचा मार्ग पुढे वाढविण्याचा निर्णय जर विद्यार्थ्यांच्या भवितव्याला आधार देणार असेल, तर प्रशासनाने कागदी कारणांमागे लपण्याऐवजी निर्णय घ्यावा, अशी भूमिका मेश्राम यांनी मांडली. निवेदन देताना राजेंद्र मेश्राम यांच्यासह नांद परिसरातील विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. आता आगार प्रशासन या मागणीवर काय निर्णय घेते, याकडे परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# वीजचोरीला लगाम! नागपूर परिमंडळात एप्रिलपासून २,३२२ प्रकरणांमध्ये कारवाई

### १.३५३ दशलक्ष युनिट वीज चोरीपोटी सुमारे २.६५ कोटी रुपयांची आकारणी, १.८४ कोटींची वसुली

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

वीज वितरण यंत्रणेतील अनधिकृत वीजवापर आणि वीजचोरीला आळा घालण्यासाठी महावितरणच्या नागपूर परिमंडलामध्ये सुरू असलेल्या तपासणी मोहिमेला चांगला प्रतिसाद मिळत आहे. एप्रिल ते ऑगस्ट या कालावधीसह २० सप्टेंबर पर्यंत नागपूर परिमंडलामध्ये एकूण २,३२२ प्रकरणे आढळून आली आहेत. या प्रकरणांमध्ये एकूण १.३५३ दशलक्ष युनिट चोरीच्या वीज वापराचे मूल्यांकन करण्यात आले असून सुमारे २.६५ कोटींची आकारणी करण्यात आली आहे.





एप्रिल ते ऑगस्टदरम्यान नागपूर परिमंडलामध्ये १,५९६ प्रकरणे आढळली. त्यामध्ये ०.९११ दशलक्ष वीज वापराचे मूल्यांकन करून सुमारे १.९९ कोटींची आकारणी करण्यात आली. यापैकी १,११३ प्रकरणांमध्ये १.४४५ कोटींची वसुली करण्यात आली असून ९८९ प्रकरणे तडजोडीच्या प्रक्रियेत निकाली काढण्यात आली. तसेच १० प्रकरणांमध्ये भारतील विद्युत कायदा २००३ च्या कलम १३५ अन्वये विविध पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले.

सप्टेंबर महिन्यात ही तपासणी मोहिमे अधिक आक्रमक करण्यात आली असून या महिन्यात आतापर्यंत ७२६ प्रकरणे आढळून आली असून चोरीच्या ०.४४२ दशलक्ष युनिट वीज वापराचे मूल्यांकन करण्यात आले. त्यानुसार सुमारे ०.९६ कोटींची आकारणी झाली असून २८४ प्रकरणांमध्ये ०.४३८ कोटींची वसुली करण्यात आली. तसेच १७९ प्रकरणे तडजोडीच्या प्रक्रियेत निकाली काढण्यात आली.

या मोहीमेत नागपूर ग्रामीण मंडलात एप्रिल ते ऑगस्टदरम्यान ५८८ प्रकरणे आढळली. त्यामध्ये ०.७२१ कोटींची आकारणी झाली असून ०.५२७ कोटींची वसुली करण्यात आली. सप्टेंबरमध्ये आणखी २९९ प्रकरणे आढळून आली आणि ०.३९७ कोटींची आकारणी करण्यात आली. याशिवाय नागपूर शहर मंडळात एप्रिल ते ऑगस्टदरम्यान ४७३ प्रकरणे आढळून आली. या प्रकरणांमध्ये ०.६८९ कोटींची आकारणी आणि ०.३९६ कोटींची वसुली झाली. सप्टेंबरमध्ये ३१२ प्रकरणे आढळून आली असून ०.४४२ कोटींची आकारणी करण्यात आली.

वर्धा मंडलात एप्रिल ते ऑगस्टदरम्यान ५३५ प्रकरणे आढळली. या प्रकरणांत ०.५८० कोटींची आकारणी करून ०.५२३ कोटींची वसुली करण्यात आली. विशेष म्हणजे ४२७ प्रकरणे तदजोडीच्या प्रक्रियेत निकाली काढण्यात आली. सप्टेंबरमध्ये ११५ प्रकरणे आढळून आली असून ०.१२० कोटींची आकारणी करण्यात आली.

महावितरणकडून वीजचोरी आणि अनधिकृत वीजवापराविरोधात नियमित तपासणी, मीटर तपासणी तसेच आवश्यकतेनुसार कायदेशीर कारवाई केली जात आहे. या मोहिमेचा उद्देश केवळ थकबाकी किंवा दंडाची वसुली करणे नसून वीज वितरणातील पारदर्शकता वाढवणे, प्रामाणिक वीज ग्राहकांच्या हिताचे संरक्षण करणे आणि वितरणातील वीजहानी कमी करणे हा आहे.

वीजचोरीमुळे निर्माण होणारी वीजहानी आणि आर्थिक नुकसान अखेरीस संपूर्ण ग्राहक व्यवस्थेवर परिणाम करते. त्यामुळे ग्राहकांनी अधिकृत वीज जोडणीचा वापर करावा, मीटरमध्ये कोणतीही छेडछाड करू नये आणि वीजचोरीची माहिती महावितरणच्या अधिकृत माध्यमांद्वारे कळवावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# खरेदी विक्री संस्थेतील खतांच्या ३५३७ बॅगा गेल्या कुठे?

### ३३ .५१ लाखांचा गैरव्यवहार, गुन्हा दाखल होऊन महिना उलटला, आरोपी मोकाटच!

**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

शेतकऱ्यांसाठी आलेल्या खतांच्या साठ्यात तब्बल ३५३७ बॅगांची तफावत! किंमत तब्बल ३३ लाख ५१ हजार रुपये! लेखापरीक्षणात हा धक्कादायक प्रकार उघडकीस आला, तक्रार झाली आणि पोलिसांनी गुन्हाही दाखल केला. मात्र, महिना उलटून गेला तरी आरोपींवर अटकेची कारवाई झालेली नाही. त्यामुळे खतांच्या बॅगा गायब होण्याइतकेच या प्रकरणातील पोलिस तपासाचे गूढही वाढले आहे.

भिवापूर तालुका शेतकी सहकारी खरेदी-विक्री समितीच्या सन २०२२ ते २०२४ या कालावधीच्या चाचणी लेखापरीक्षणात खतसाठ्यात मोठी तफावत आढळली. ३१ मार्च २०२४ रोजी स्टॉकबुकमध्ये ४२३३ बॅगांची नोंद होती. मात्र, १५ एप्रिल रोजी प्रत्यक्ष पाहणीत केवळ ७१० बॅगा आढळल्या. पुढे ६ एप्रिल २०२६ रोजी केलेल्या तपासणीत ६९६ बॅगांचा साठा दिसून आला. म्हणजेच स्टॉकबुक आणि प्रत्यक्ष साठ्यात तब्बल ३५३७ बॅगांची तफावत!

**बॅगा गायब झाल्या की विकल्या?**

लेखापरीक्षण अहवालानुसार, या खतांची विक्री अथवा ती गहाळ झाल्याचे दिसून येते. मात्र, त्यापोटीची रक्कम संस्थेच्या खात्यात जमा झालेली नसल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे संस्थेला ३३ लाख ५१ हजार ५० रुपयांचे आर्थिक नुकसान झाल्याचे लेखापरीक्षकांनी स्पष्ट केले आहे.

या प्रकरणात गोडाऊन किपर मीरा विलास खोब्रागडे, सहव्यवस्थापक सुरेश एम. नागोसे आणि तत्कालीन सभापती चरणजितसिंग अरोरा यांच्यावर जबाबदारी निश्चित करण्यात आली. खोब्रागडे यांनी काही खतांची विक्री तत्कालीन सभापती व सहव्यवस्थापकांच्या सूचनेनुसार केल्याचे आपल्या लेखी खुलाशात म्हटल्याचा उल्लेख तक्रारीत आहे. साठ्यावर देखरेख ठेवण्याची जबाबदारी असतानाही संबंधितांकडून आवश्यक नियंत्रण ठेवण्यात आले नसल्याचेही लेखापरीक्षणात नमूद आहे.

**गुन्हा दाखल, पण पुढे काय?**

लेखापरीक्षक एस. ए. आकोलकर यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी १३ ऑगस्ट रोजी तिघांविरुद्ध विविध कलमांन्वये गुन्हा दाखल केला. मात्र, तत्कालीन सभापती चरणजितसिंग अरोरा यांचे यापूर्वीच निधन झाले आहे. उर्वरित दोन आरोपींना अद्याप अटक झालेली नाही.

३३ लाखांचा कथित गैरव्यवहार, हजारो खतांच्या बॅगा गायब आणि गुन्हा दाखल होऊन महिना उलटला; तरीही तपासाची गती नेमकी कुठे अडली? या प्रश्नाचे उत्तर आता पोलिसांनी देणे अपेक्षित आहे. या प्रकरणातील आर्थिक व्यवहार, खतांची विक्री आणि स्टॉकमधील तफावत यांचा सखोल तपास होऊन सत्य बाहेर येणार का, याकडे शेतकरी आणि संस्थेचे सभासद लक्ष ठेवून आहेत.

## तेजश्री उपाध्याय यांच्या आयोजनात ग्रँड कराओके सिंगिंग स्पर्धा सीझन-१० संपन्न




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

टीएम्स अकॅडमी अँड ब्युटी प्लेस यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ग्रँड कराओके सिंगिंग स्पर्धा सीझन-१० चे आयोजन उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. आयोजक सुश्री तेजश्री उपाध्याय यांच्या संकल्पनेतून झालेल्या या स्पर्धेला संगीतप्रेमी आणि स्पर्धकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या कार्यक्रमाला आंतरराष्ट्रीय गायिका व परफॉर्मर सुश्री स्नेहा उमरेडकर यांची विशेष उपस्थिती लाभली. स्पर्धेचे परीक्षण श्री जगदीश दलवी व सुश्री पूनम गावंडे यांनी केले. कार्यक्रमाला अतिथी म्हणून अनिल धकाते व डॉ. रश्मी तिरपुडे उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीने कार्यक्रमाची शोभा वाढली. स्पर्धेत अभिजीत पात्रा यांनी उत्कृष्ट सादरीकरण करत विजेतेपद पटकावले. प्रांजलि तेलंग यांनी प्रथम उपविजेतेपद, तर समीर अंडेर सहारे यांनी द्वितीय उपविजेतेपद मिळविले.

आयोजक सुश्री तेजश्री उपाध्याय यांनी सर्व विजेते आणि सहभागी स्पर्धकांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. प्रतिभावान गायकांना आपली कला सादर करण्यासाठी व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने अशा स्पर्धांचे आयोजन करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. टीएम्स अकॅडमी अँड ब्युटी प्लेसच्या संगीत क्षेत्रातील या उपक्रमाला सीझन-१० मध्येही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

# गणेशोत्सवात महावितरणचा 'ऊर्जाप्रकाश': अवघ्या ५ दिवसांत नागपूर अन् वर्ध्यात २९ हजार विद्यार्थी झाले ऊर्जासाक्षर!

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

महाराष्ट्र शासनाच्या 'राज्य महोत्सव' संकल्पनेला अत्यंत उत्साही आणि अभूतपूर्व प्रतिसाद देत महावितरणने स्तुत्य आणि भव्य 'ऊर्जा प्रबोधन महामोहीम' हाती घेतली आहे. 'हरित ऊर्जा आणि विद्युत सुरक्षेच्या माध्यमातून ऊर्जा स्वातंत्र्याकडे वाटचाल' हे प्रेरक ध्येय उराशी बाळगून १४ ते २५ सप्टेंबर २०२६ या कालावधीत ही व्यापक मोहीम यशस्वीरीत्या राबवली जात आहे. गणेशोत्सवाच्या आनंदी व चैतन्यमयी वातावरणात समाजातील शेवटच्या घटकापर्यंत हरित ऊर्जा, ऊर्जेची बचत, तिचे महत्त्व आणि सुरक्षित वापराबाबत जनजागृती करणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे.





या विशेष उपक्रमांतर्गत 'अभियंता दिना'चे औचित्य साधून महावितरणच्या नागपूर परिमंडलातील शेकडो अभियंते केवळ कार्यालयीन कामापुरते मर्यादित न राहता सामाजिक बांधिलकी जपत थेट मैदानात उतरले आहेत. अतिरिक्त कार्यकारी अभियंत्यांपासून ते कनिष्ठ अभियंत्यांपर्यंतची संपूर्ण टीम स्वतः शाळा आणि महाविद्यालयांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांना हरित ऊर्जा, वीज बचत आणि विद्युत सुरक्षेचे मोलाचे धडे देत आहे. या महामोहिमेला विद्यार्थ्यांचा आणि शिक्षण संस्थांचा उदंड प्रतिसाद लाभत असून, १५ ते १९ सप्टेंबर या अवघ्या 5 दिवसांच्या कालावधीत नागपूर जिल्ह्यातील ९१ शाळा व महाविद्यालयांतून तब्बल २०,२४३ विद्यार्थी आणि वर्धा जिल्ह्यातील ५८ शाळा व महाविद्यालयांतून ९,३१७ विद्यार्थी, असे मिळून एकूण १४९ शाळा व महाविद्यालयांतून तब्बल २९,५६० विद्यार्थ्यांना अतिशय प्रभावीपणे ऊर्जासाक्षर करण्यात आले आहे.

विद्यार्थी आणि नागरिकांना भविष्यातील ऊर्जा आव्हानांना सामोरे जाण्यासाठी सक्षम बनवण्याच्या दृष्टीने महावितरणतर्फे केंद्र व राज्य शासनाच्या विविध लोकाभिमुख योजनांची सविस्तर माहिती दिली जात आहे. यामध्ये प्रामुख्याने पंतप्रधान सूर्यघर मोफत वीज योजना, स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफटॉप सोलर (स्मार्ट) योजना, ई-व्हेंकिल (एव्ह) धोरण, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना, सौर कृषी पंप आणि महावितरणचा 'गो ग्रीन' कागदविरहित कारभार यांसारख्या अत्यंत महत्त्वाकांक्षी योजनांचा समावेश आहे. यासोबतच दैनंदिन आयुष्यात किंवा घरगुती वापरादरम्यान घडणारे वीज अपघात टाळण्यासाठी कोणती खबरदारी घ्यावी आणि आपत्कालीन परिस्थितीत कोणते उपाय योजावेत, याचे व्यावहारिक प्रात्यक्षिक व मार्गदर्शनही तज्ज्ञ अभियंत्यांकडून केले जात आहे.

केवळ शाळा आणि महाविद्यालयांपुरतेच मर्यादित न राहता, महावितरणने या जनजागृतीचा विस्तार परिमंडलातील प्रमुख गणेशोत्सव मंडळांपर्यंत केला आहे. गणेशोत्सवाच्या काळात वीज सुरक्षेला प्राधान्य मिळावे यासाठी उत्सवासाठी केवळ अधिकृत वीज जोडणीचाच वापर करावा, सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असणारे ELCB (अर्थ लीकेज सर्किट ब्रेकर) हे उपकरण प्रत्येक मंडळाने अनिवार्यपणे लावावे, विजेची बचत करण्यासाठी देखाव्यांमध्ये आणि रोषणाईसाठी एलईडी दिव्यांचा जास्तीत जास्त वापर करावा, तसेच हरित ऊर्जेचा आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारे प्रबोधनात्मक देखावे उभारावेत, असे नम्र व आग्रही आवाहन महावितरणतर्फे करण्यात आले आहे.

या राज्य महोत्सवात सर्व नागरिकांनी आणि गणेश भक्तांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन हरित ऊर्जा व विद्युत सुरक्षेचा हा मूलमंत्र आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनवावा, अशी भावना महावितरणने व्यक्त केली आहे. हा स्तुत्य उपक्रम येत्या २५ सप्टेंबरपर्यंत परिमंडलातील शाळा, महाविद्यालये आणि सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांमध्ये पूर्ण तीव्रतेने सुरू राहणार आहे.

# सातव्या दिवशी ४ हजार ५५० श्री गणेश मूर्तींचे कृत्रिम हौदात विसर्जन

## मनपाच्या व्यवस्थेचा नागरिकांना लाभ

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर महानगरपालिकेच्या वतीने श्रीगणेश मूर्तींच्या पर्यावरणपूरक पद्धतीने विसर्जनासाठी शहरातील विविध ठिकाणी कृत्रिम विसर्जन हौदांची व्यवस्था करण्यात आली आहे. रविवार (ता.२०) रोजी सातवा दिवशी नागरिकांनी मनपाद्वारे ४९ ठिकाणी उभारण्यात आलेल्या १३७ कृत्रिम तलावांचा वापर करीत ४ हजार ३०३ मातीच्या आणि २४७ पीओपीच्या, अशा एकूण ४ हजार ५५० श्रीगणेश मूर्तींचे विसर्जन करण्यात आले.

नागपूर महानगरपालिकेने पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी शहरात टप्प्याटप्प्याने ४१९ कृत्रिम विसर्जन कुंडांची व्यवस्था केली जात आहे. याशिवाय मोठ्या आकाराच्या श्रीगणेश मूर्तींच्या विसर्जनासाठी गोरेवाडा, पोलीस लाईन टाकळी, लकडगंज येथील कच्छीविसा आणि कोराडी येथे विशेष मोठ्या कृत्रिम तलावांची व्यवस्था करण्यात आली आहे. विसर्जनासाठी येणाऱ्या नागरिकांना आवश्यक मार्गदर्शन व सहकार्य मिळावे यासाठी ग्रीन विजिल फाऊंडेशन सारख्या स्वयंसेवी संस्था तसेच रामदेवबाबा विद्यापीठ या शैक्षणिक संस्थेतील विद्यार्थीही स्वयंस्फूर्तीने सहभागी होत आहेत.





### झोननिहाय विसर्जन

लक्ष्मीनगर झोनमध्ये १२ कृत्रिम तलाव उभारण्यात आले असून, सातव्या दिवशी १ हजार २२७ मातीच्या आणि ३२ पीओपीच्या अशा एकूण १ हजार २५९ श्रीगणेश मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. धरमपेठ झोनमध्ये ५९ कृत्रिम तलावांची व्यवस्था करण्यात आली असून, येथे १ हजार ६९८ मातीच्या आणि ११७ पीओपीच्या अशा एकूण १ हजार ८१५ मूर्तींचे विसर्जन झाले. हनुमाननगर झोनमध्ये १७ कृत्रिम तलाव उभारण्यात आले असून येथे ५४१ मातीच्या आणि १० पीओपीच्या मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. धंतोली झोनमध्ये ४ कृत्रिम तलावांमध्ये ३१८ मातीच्या आणि ४९ पीओपीच्या अशा एकूण ३६७ मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. नेहरूनगर झोनमध्ये २ कृत्रिम तलावांची व्यवस्था असून येथे ३८६ मातीच्या आणि ३४ पीओपीच्या अशा एकूण ४२० मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. गांधीबाग झोनमध्ये २२ कृत्रिम तलाव उभारण्यात आले असून येथे ५ मातीच्या मूर्तींचे विसर्जन झाले. सतरंजीपुरा झोनमध्ये १ कृत्रिम तलावामध्ये ३६ मातीच्या आणि २ पीओपीच्या मूर्तींचे, आशीशीनगर झोन मध्ये २ कृत्रिम तलावामध्ये १२ मातीच्या आणि ३ पीओपीच्या अशा एकूण १५ मूर्तींचे, तर मंगळवारी झोनमधील १७ कृत्रिम तलावांमध्ये ७३ मातीच्या मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. या सोबत पोलीस लाईन टाकळी येथे महानगपालिकेने उभारलेल्या कृत्रिम तलावात ७ मातीच्या श्रीगणेश मूर्तींचे विसर्जन करण्यात आले.

नागरिकांनी पर्यावरणपूरक गणेशोत्सवाला प्राधान्य देत मनपाने उपलब्ध करून दिलेल्या कृत्रिम विसर्जन तलावांचा वापर केला असून, नैसर्गिक जलस्रोतांचे प्रदूषण रोखण्यासाठी मनपाच्या या उपक्रमाला नागरिकांचा सहभाग मिळत आहे.

### विविध संस्थांचे सहकार्य

विसर्जनावेळी नागरिकांना सहकार्य करण्यासाठी आणि योग्य माहिती देण्यासाठी ग्रीन व्हिजिल फाउंडेशन आणि रामदेवबाबा विद्यापीठाचे स्वयंसेवक विद्यार्थी यांच्यासह इतर स्वयंसेवक स्वयंस्फूर्तीने सहभाग नोंदवीत आहेत. यात सर्व कौस्तुभ चॅटर्जी, सुरभि जैसवाल, मेहुल कोसुरकर, श्रिया जोगे, प्रिया यादव, तुषार देशमुख, रामदेवबाबा विद्यापीठाचे स्वयंसेवक कु. हार्दिक अग्रवाल,अनुष्का गुरवे, हर्ष जोरा,अमेय शेंडे, अवंती जोशी उपस्थित आहेत.

**कृत्रिम तलावाची माहिती आता एका क्लिकवर**

नागरिकांना त्यांच्या परिसरातील कृत्रिम विसर्जन तलावाची माहिती सहज मिळावी यासाठी मनपाने क्यूआर कोड आणि डिजिटल मॅपची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. https://ganpati-zone-map.emergent.host या संकेतस्थळावर तसेच क्यूआर कोड स्कॅन केल्यानंतर झोननिहाय कृत्रिम तलावांची माहिती मिळू शकते. संबंधित तलावापर्यंत पोहोचण्यासाठी गुगल मॅप द्वारे दिशादर्शनाची सुविधाही उपलब्ध आहे.

**निर्माल्य रथासाठी टोल फ्री नंबर**

निर्माल्य रथा संदर्भात माहिती जाणून घेण्यासाठी नागरिकांसाठी मनपाने १८०० २६७७ ९६६ हा टोल फ्री लोकांसाठी उपलब्ध केला आहे.

---

**थोडक्यात**

## रस्ते अपघातात दोन माकडांचा मृत्यू

**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

आज सकाळी सुमारे साडेदहा वाजता सावनेर-नागपूर मुख्य रस्त्यावर झालेल्या एका रस्ते अपघातात दोन माकडांचा दुर्दैवी मृत्यू झाला. प्रत्यक्षदर्शींच्या म्हणण्यानुसार, माकडे रस्ता ओलांडत असताना नागपूरहून येणाऱ्या एका अज्ञात भरधाव वाहनाने त्यांना धडक दिली. अपघातात दोघांचाही जागीच मृत्यू झाला. धडक झाल्यानंतर चालक वाहनासह फरार झाला.



हितज्योती आधार फाउंडेशनचे हितेश बनसोड यांनी या घटनेची माहिती खापा येथील वनविभागाला दिली. माहिती मिळताच, वनविभागाचे पथक घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी पंचनामा तयार केला. हितज्योती आधार फाउंडेशनचे संस्थापक हितेश बनसोड आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या मदतीने दोन्ही माकडांवर अंत्यसंस्कार करण्यात आले.

## गणेश विसर्जनासाठी सावनेर नगरपालिकेकडून ठिकठिकाणी कृत्रिम जलकुंड




**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

गणेश विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर सावनेर नगरपालिकेच्या वतीने शहरात ठिकठिकाणी कृत्रिम जलकुंडांची व्यवस्था करण्यात आली आहे. पर्यावरणपूरक विसर्जन व्हावे व नैसर्गिक जलस्त्रोतांचे प्रदूषण टाळावे, या उद्देशाने ही व्यवस्था करण्यात आली आहे. भाविकांनी आपल्या गणेश मूर्तींचे विसर्जन नदी-नाल्यात न करता नगरपालिकेने तयार केलेल्या कृत्रिम जलकुंडातच करावे, असे आवाहन नगराध्यक्षा संजनाताई मंगळे, उपाध्यक्ष राजु घुगल, मुख्याधिकारी अर्शीया जुही यांनी भाविकांना केले आहे. बस स्थानक, राजकम चौक, बाजार चौक, मुरलीधर मंदिर परीसर तसेच शिवमंदिर परिसरातील प्रत्येक कृत्रिम जलकुंडाजवळ कर्मचारी, स्वच्छता दूत व स्वयंसेवक तैनात करण्यात आले असून निर्माल्य संकलनासाठी स्वतंत्र कचराकुंड्या ठेवण्यात आल्या आहेत.

## प्रतिबंधित सुगंधीत तंबाखुसह ४ लाख ८० रुपयांचा माल जप्त, केळवद पोलीसांची कारवाई



**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

तालचक्यातील केळवद पोलिसांनी सुचनेच्या आधारावर नाकाबंदी करुन प्रतिबंधित सुगंधी तंबाखूची अवैध तस्करी करणाऱ्या आरोपीला अटक करुन कार्यवाही केली. (दि.१८) शुक्रवारच्या मध्यरात्री आरोपीकडून ३०.१९१ किलो सुगंधी तंबाखूसह ४ लाख ८० हजार २६० रुपये किमतीचा माल जप्त करण्यात आला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार दि. १८ सप्टेंबर रोजी रात्री गस्तीदरम्यान मिळालेल्या माहितीच्या आधारे बिहाडा फाटा सावनेर-पांढुर्णा महामार्गावर नाकाबंदी करण्यात आली. आरोपी फैसल सैफुल्ला पठाण (वय २४ वर्षे, टेका नाका, नागपूर) याला एमएच४९/सीएस ८७०६ क्रमांकाच्या गाडीतून प्रतिबंधित तंबाखुसह अटक करण्यात आली.

कारची झडती घेतली असता त्यामध्ये ६० हजार २६० रुपये किंमतीचा प्रतिबंधित सुगंधी तंबाखू आढळून आला.प्रतिबंधित सुंगधित तंबाखुची तस्करी मध्यप्रदेश पांढुर्णा येथुन नागपुरला करण्यात येत होती. पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार कारची किंमत ४ लाख रुपये,व २० हजार रुपये किंमतीचा एक मोबाईल फोनही जप्त केला. ही कार्यवाही नागपुर ग्रामीण पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अनिल म्हस्के यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार आशिषसिंह ठाकुर,उपनिरीक्षक अरुण राठोड यांनी केली.सावनेर न्यायालयाच्या आदेशाने आरोपीला नागपुर मध्यवर्ती कारागूहात पाठविण्यात आले.

## मृत कर्मचाऱ्याच्या जागेवर पत्नीला मिळाली नोकरी, राजेश रंगारी यांच्या संघर्षाला यश



**दै. सिंहवाणी वृत्त, कोराडी-मिलिंद गाडेकर**

मृत कंत्राटी कामगार अनिल सूर्यभानजी महाल्ले यांच्या जागी गायत्री महाल्ले यांना कामावर घेण्यास एकेए लॉजिस्टिक्स कॉन्ट्रॅक्टर तयार झाल्यामुळे गायत्री महाल्ले कुटुंबाचे आमरण उपोषण श्री. राजेश भाऊ रंगारी यांच्या मध्यस्थीने आंदोलन स्थगित करण्यात आले. ऊर्जाभवन कार्यालय कोराडी येथे बैठक झाली. गायत्री महाल्ले, राजेश रंगारी माजी नगराध्यक्ष, उपाध्यक्ष नागपूर जिल्हा, औद्योगिक संबंध अधिकारी मुकेश मेश्राम, अधीक्षक अभियंता कुणाल घाटे, किरण नानवटकर, एकेए लॉजिस्टिकचे प्रोजेक्ट मॅनेजर नंदकिशोर धुळे, अभिजीत घोष, तसेच कामगार संघटनेच्यावतीने, राहुल नागदेवे, अजित गेडाम, प्रवीण घोडेस्वार, राजेश हरीहर, संजय महाले,प ावन भोंगाडे, नितीन मनवर, युवराज वासनिक, विनीत बनसोड आणि ईतर कंत्राटी कामगार उपस्थित होते.

---

## एका राज्यात दोन नियम का? डीजे परवानगीवरून ललित खंडेलवालांचा सरकारला घरचा अहेर

### अमरावती, पुणे, साताऱ्याला परवानगी तर नागपूरला का नाही?, नागपूर महाराष्ट्राच्या बाहेर आहे की भारताबाहेर? असा सवाल

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

महाराष्ट्रात गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा होत असताना गणेश विसर्जन मिरवणुकीतील डीजे व धुमालच्या परवानगीवरून आता चर्चा सुरू झाली आहे. राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये ध्वनिक्षेपक व डीजे वापराबाबत वेगवेगळ्या पद्धतीने निर्णय घेतले जात असल्याचा मुद्दा उपस्थित करत शिंदे सेनेचे मोवाड नगरपालिकेचे नगरसेवक ललित खंडेलवाल यांनी सरकार आणि प्रशासनाला घरचा अहेर दिला आहे.

गणेश विसर्जन मिरवणुकीत डीजे, धुमाल आणि पारंपरिक वाद्यांना विशेष महत्त्व असते. पुणे, अमरावती, सातारा आदी जिल्ह्यांमध्ये प्रशासनाकडून नियम व अटींच्या अधीन राहून ध्वनिक्षेपक वापराबाबत सवलती देण्यात आल्याचे सांगितले जात आहे. मात्र नागपूर जिल्ह्यात डीजेच्या वापराबाबत निर्बंध असल्याने एकाच राज्यात वेगवेगळे नियम का, असा सवाल ललित खंडेलवाल यांनी उपस्थित केला आहे.

मुख्यमंत्री आणि केंद्रीय मंत्री असलेल्या नागपूर जिल्ह्यातच गणेशोत्सवाच्या मिरवणुकीसाठी डीजेला परवानगी का दिली जात नाही, असा प्रश्न उपस्थित करत खंडेलवाल यांनी प्रशासनाने या विषयावर तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी केली आहे. ‎अमरावती, पुणे आणि सातारयात नियमांच्या चौकटीत परवानगी दिली जात असेल, तर नागपूरला वेगळा न्याय का? नागपूर महाराष्ट्राच्या बाहेर आहे की भारताबाहेर? असा सवाल त्यांनी केला.



गणेशोत्सवाच्या मिरवणुकीत सहभागी होणाऱ्या गणेश मंडळांच्या भावना लक्षात घेऊन ध्वनीमयार्दा, वेळेचे बंधन आणि कायदा-सुव्यवस्थेच्या नियमांचे पालन करून डीजे व धुमालला परवानगी देण्याचा मार्ग प्रशासनाने शोधावा, अशी मागणी त्यांनी केली आहे. विशेषतः ४ बेस आणि ४ टॉपच्या मर्यादित संचाला नियमांच्या चौकटीत परवानगी देण्याची मागणी त्यांनी केली.

हिंदुत्ववादी विचारसरणीचे सरकार राज्यात आणि केंद्रात सत्तेत असताना हिंदूंच्या प्रमुख सणांबाबत जिल्हानिहाय वेगवेगळे नियम असू नयेत, अशी भूमिका खंडेलवाल यांनी मांडली. हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आज असते, तर हिंदू सणांच्या उत्सवावर अशा प्रकारची बंदी कायम राहिली असती का, असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

नागपूर जिल्हाधिकारी यांनी गणेश मंडळांच्या मागणीचा सहानुभूतीपूर्वक विचार करून नियम व अटींच्या अधीन राहून डीजे आणि धुमालला परवानगी द्यावी, अशी मागणी शिंदे सेनेचे मोवाड नगरपालिकेचे नगरसेवक ललित खंडेलवाल यांनी केली आहे. त्यामुळे आता प्रशासन या मागणीवर काय निर्णय घेते, याकडे गणेश मंडळांसह नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## विजेच्या संपर्कात आल्याने अजगर व सारसाचा मृत्यू

**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

विजेच्या तुटलेल्या तारांच्या संपर्कात आल्याने एक भल्यामोठ्या अजगर व सारस या प्राण्याचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना उघडकीस आल्याने एकच खळबळ उडाली. मिळालेल्या माहितीनुसार हरिभाऊ आदमने कला वाणिज्य महाविद्यालयाच्या मागे असलेल्या धनराज हिरालाल भोंगा यांच्या शेतात आज सुमारे ११ वाजता एल टी कंन्डक्टर या मुख्य विद्युत वाहिनी चे तार तुटून दिसून आले. मालकाने घटनास्थळावर जाऊन पाहता त्यांना मोठा अजगर प्रजातीचा साप विद्युत ताराखाली मृत्यू अवस्थेत दिसून आला. सदर घटनेची माहीती नितीन भोंगा यांचय्याकडून सेवकरी मित्रपरिवाराचे भूषण कुबडे यांना माहिती मिळाली असताच त्यांनी सदर माहिती वनविभाग खापा, स्थानिक पोलीस स्टेशन आणि महावितरण अधिकाऱ्याला माहिती देण्यात आली. वनपरिक्षेत्र खापा येथील अधिकारी कर्मचारी, महावितरण सावनेरचे उप अभियंता राहुल ललके आपल्या अधिनस्त कर्मचाऱ्यांना सोबत घेऊन घटनास्थळी दाखल झाले.व वाहत्या विद्युत ताराखाली अडकून मुत्यछ पावलेल्या दोन्ही प्राण्यांना खापा वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी आपल्या ताब्यात घेतले यावेळी भूषण कुबडे, भावेश वाखोरे, विशाल प्रधान, शुभम लाड नितीन भोंगा सेवेकरी मित्रपरिवार उपस्थित होते.पाऊस सुरू असल्याने त्यामुळेच एखादे झाड कोसळले असावे.



---

# राजीव गांधी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मेसमध्ये झुरळ, अळया आणि उंदरांची विष्ठा

**दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर**
**(धनंजय पांढरे)**

येथील राजीव गांधी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या वसतिगृहातील मेसच्या भोजनाच्या दर्जावरून विद्यार्थ्यांमध्ये तीव्र संताप निर्माण झाला आहे. जेवणात झुरळ, अळ्या, विविध प्रकारचे कीटक तसेच उंदरांची विष्ठा व अवशेष आढळल्याचा गंभीर आरोप विद्यार्थ्यांनी केला आहे. या प्रकाराच्या निषेधार्थ विद्यार्थ्यांनी रविवारी, २१ सप्टेंबर रोजी जेवणाचा बहिष्कार टाकत महाविद्यालयाच्या पायऱ्यांवर ठिय्या आंदोलन सुरू केले.विद्यार्थ्यांच्या म्हणण्यानुसार, गेल्या काही दिवसांपासून मेसच्या जेवणासह नाश्त्यामध्ये वारंवार कीटक, झुरळे आणि अळ्या आढळत आहेत. रविवारी भोजनामध्ये उंदरांची विष्ठा व अवशेष आढळल्याचा आरोपही करण्यात आला.



वारंवार तक्रारी करूनही भोजनाच्या गुणवत्तेत अपेक्षित सुधारणा न झाल्याने विद्यार्थ्यांनी आंदोलनाचा मार्ग स्वीकारला. काही विद्यार्थ्यांनी सुमारे २४ तासांपासून अन्न ग्रहण केले नसल्याचेही सांगण्यात आले. विद्यार्थ्यांनी मेसचा सध्याचा कंत्राटदार तात्काळ हटवावा, कंत्राट रद्द करून संबंधित कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकावे आणि स्वच्छ, सुरक्षित व दजेर्दार भोजन देणाऱ्या नव्या कंत्राटदाराची नियुक्ती करावी, अशी मागणी केली आहे. तसेच वसतिगृहाच्या स्वयंपाक घरासाठी कडक स्वच्छता नियमावली लागू करून दररोज स्वच्छता व जंतुनाशक फवारणी करावी, अशी मागणीही करण्यात आली. जेवणाच्या गुणवत्तेवर नियमित देखरेख ठेवण्यासाठी विद्यार्थ्यांची स्वतंत्र समिती स्थापन करून दर आठवड्याला भोजनाची तपासणी करावी, अशी मागणी विद्यार्थ्यांनी प्रशासनाकडे केली आहे.

दरम्यान, विद्यार्थ्यांच्या आंदोलनाची माहिती मिळाल्यानंतर अन्न व औषध प्रशासनही सतर्क झाले आहे. मेसच्या स्वयंपाकघरातील स्वच्छतेची पाहणी करण्यासोबतच वापरले जाणारे तेल, धान्य आणि तयार अन्नाचे नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविण्याची प्रक्रिया सुरू झाल्याचे सांगण्यात आले. तपासणीमध्ये अन्नाची गुणवत्ता किंवा स्वच्छतेसंदर्भात गंभीर त्रुटी आढळल्यास संबंधितांवर नियमानुसार कारवाई होण्याची शक्यता आहे. विद्यार्थ्यांच्या आंदोलनादरम्यान महाविद्यालय प्रशासनाकडून भोजनात कीटक आढळणे ही सामान्य बाब असल्याचे सांगण्यात आल्याचा आरोप विद्यार्थ्यांनी केला. या वक्तव्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आणि पालकांमध्ये आणखी संताप निर्माण झाल्याचे आंदोलनकर्त्यांचे म्हणणे आहे.

महाविद्यालयातील वसतिगृहात दररोज सुमारे ३०० ते ४०० विद्यार्थ्यांसाठी भोजन तयार केले जाते. भोजन तयार करताना कधीतरी कीटक पडला असावा, असे महाविद्यालय प्रशासनाकडून सांगण्यात आले असून, संबंधितांना स्वच्छ व दर्जेदार भोजन देण्याच्या सूचना देण्यात आल्याचे स्पष्ट करण्यात आले. प्राप्त माहितीनुसार, मागील वर्षी प्राप्त झालेल्या चार-पाच निविदांपैकी सर्वांत कमी दर समर्थ कॅटर्सचा असल्याने त्यांना मेसचे काम देण्यात आले होते. मागील काही दिवसांपासून विद्यार्थ्यांच्या तक्रारी प्राप्त होत असून, नवीन कंत्राटदाराचा शोध सुरू आहे.

जुन्या कंत्राटाचे नूतनीकरण करण्यात आलेले नसून, नवीन कंत्राटदार मिळेपर्यंत त्यांच्याकडून काम सुरू ठेवण्यात आले होते. विद्यार्थ्यांच्या तक्रारींची दखल घेत संबंधित कंत्राटदारावर तातडीने कारवाई करून त्याला निलंबित करण्याची संस्थेची तयारी असल्याचेही त्यांनी सांगितले. दरम्यान, विद्यार्थी, महाविद्यालय प्रशासन आणि समितीच्या सदस्यांमध्ये चचेर्ची प्रक्रिया सुरू होती. मात्र, भोजनाच्या गुणवत्तेबाबत ठोस निर्णय होईपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याची भूमिका विद्यार्थ्यांनी घेतली आहे.

थोडक्यात

## जिल्हास्तरीय ज्युदो स्पर्धेत सेंट ॲन्सच्या विद्यार्थ्यांची उल्लेखनीय कामगिरी, हर्ष बसोलेची विभागीयस्तरासाठी निवड



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नागपूर यांच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय शालेय ज्युदो स्पर्धा २०२६-२७ विभागीय क्रीडा संकुल, नागपूर येथे पार पडली. या स्पर्धेत सेंट ॲन्स इंग्लिश मीडियम स्कूल, दहेगाव (रं.), ता. सावनेर, जि. नागपूरच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत एकूण पाच पदकांची कमाई केली. हर्ष बसोले याने सुवर्णपदक पटकावले असून, त्याची आगामी विभागीयस्तरीय ज्युदो स्पधेर्साठी निवड झाली आहे. भूपेश गोरे याने रौप्यपदक, तर शौर्य सहारे, रुद्र काटोरे आणि एंजल अंदासकर यांनी कांस्यपदक मिळविले. विद्यार्थ्यांनी स्पर्धेत उत्कृष्ट कौशल्य, शिस्त आणि जिद्दीचे प्रदर्शन केले.

हर्ष बसोलेच्या विभागीयस्तरीय स्पर्धेसाठी झालेल्या निवडीबद्दल तसेच सर्व पदकविजेत्या विद्यार्थ्यांचे शाळेच्या मुख्याध्यापिका सिस्टर क्लिओफास, कॉरस्पॉन्डंट सिस्टर सिरिया पुष्पम, शिक्षकवृंद आणि क्रीडा विभागाच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. हर्ष बसोलेने विभागीयस्तरावरही उत्कृष्ट कामगिरी करून शाळेचे नाव उज्वल करावे, यासाठी त्याला शुभेच्छा देण्यात आल्या.

## मंदाताई हुंगे यांचे निधन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**



४०३, गुरुकुंज अपार्टमेंट,मित्रविहार नगर येथील रहिवासी जेष्ठ नागरिक गं.भा. मंदाताई सुरेशराव हुंगे यांचे सोमवार, दिनांक २१ सप्टेंबर २०२६ रोजी पहाटे ५.३० वाजता घरी दीर्घआजाराने दुःखद निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ७४ वर्ष होते.त्यांचे पश्चात एक मुलगा- उत्पल, स्नुषा- तृप्ती, दोन मुली-नताशा पारशिवणीकर व विजया सोरते,जावई,नातू-पणतू, आणि बराच मोठा आप्त व मित्रपरिवार आहे. स्व.मंदाताई या अत्यंत धार्मिक,सुसंस्कृत सुस्वभावी व्यक्तिमत्त्वाच्या होत्या.त्यांच्या पार्थिवावर सोमवारी सायंकाळी स्थानिक गंगाबाई घाटावर अंत्यसंस्कार करण्यात आले. गजानन देवळीकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या शोकसभेत डॉ. शांतीदास लुंगे, किशोर पारशिवणीकर, राजू काळबांडे यांनी आपल्या शोक संवेदना व्यक्त केल्या.

## 'करिअर कट्टा'तून विद्यार्थ्यांना उद्योजकतेचे धडे



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या करिअर कट्टा उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी लेट्स एक्स्प्लोअर द एक्सायटींग वर्ल्ड ऑफ एंटरप्रीनरशीप - एनईईव्ही या विषयावर विशेष मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन श्री निकेतन आर्ट्स कॉमर्स कॉलेज, नागपूर येथे करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. मेधा कानेटकर उपस्थित होत्या. कार्यक्रमासाठी डॉ. अनिता राव या विशेष अतिथी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉक्टर राजेंद्र मालकर व्यासपीठावर उपस्थित होते. डॉ. अनिता राव यांनी विद्यार्थ्यांना उद्योजकतेच्या विविध पैलूंबाबत मार्गदर्शन केले. यावेळी विद्यार्थ्यांनी उद्योजकतेशी संबंधित विविध प्रश्न विचारून शंकांचे निरसन करून घेतले.

अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. मेधा कानेटकर यांनी विद्यार्थ्यांनी बदलत्या काळानुसार आपल्या कौशल्यांमध्ये सातत्याने वाढ करणे आवश्यक असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे आयोजन करिअर कट्टा समन्वय प्रा. सारिका पाटील डॉ. मृण्मयी कानेटकर,विपुल टेंभुर्णीकर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, करिअर कट्टा सदस्य हर्षल उईके यांनी केले. प्रास्ताविक दिव्या वाघमारे यांनी, अतिथी परिचय प्रेरणा मोहाडीकर यांनी तर आभार प्रदर्शन सरगम शेंडे हिने केले. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापकवर्ग, कार्यालयीन कर्मचारी वर्ग, आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संजय गांधी निराधार व श्रावणबाळ योजनेच्या लाभार्थ्यांना हयात प्रमाणपत्र सादर करण्याचे आवाहन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

महाराष्ट्र शासनाच्यावतीने राबवण्यात येणाऱ्या संजय गांधी निराधार अनुदान योजना आणि श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना या वैयक्तिक लाभाच्या योजना नागपूर शहर महानगरपालिका क्षेत्रात सुरू आहेत. केंद्र शासन पुरस्कृत योजनांच्या धर्तीवर, या योजनांमधील सर्व पात्र लाभार्थ्यांनी ७ मे २०२६ च्या शासन निर्णयानुसार लाभार्थी पडताळणी प्रणालीच्या माध्यमातून डिजिटल हयात प्रमाणपत्र ऑनलाइन पद्धतीने सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. परंतु अनेक लाभार्थ्यांनी अद्याप हे प्रमाणपत्र सादर केलेले नाही.

ज्या लाभार्थ्यांनी आतापर्यंत ऑनलाइन हयात प्रमाणपत्र तयार केलेले नाही, त्यांनी तत्काळ मोबाईलवर हे अँप डाऊनलोड करून किंवा आपले सरकार सेवा केंद्रावर (सीएससी) जाऊन ही प्रक्रिया पूर्ण करावी. हे प्रमाणपत्र ऑनलाइन पद्धतीने सादर झाल्यानंतर त्याची प्रत कार्यालयात प्रत्यक्ष आणून देण्याची गरज नाही. वाढत्या वयामुळे किंवा दिव्यांगत्वामुळे ज्या लाभार्थ्यांचे अंगठ्याचे अथवा बोटांचे ठसे जुळत नाहीत किंवा इतर तांत्रिक अडचणी येत आहेत, अशा लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह जिल्हाधिकारी कार्यालयातील संजय गांधी योजना शाखेत प्रत्यक्ष हजर राहून आपल्या अडचणी दूर करून घ्याव्यात.

# स्व. भानुताई गडकरी मेमोरियल डायग्नोस्टिक सेंटर येथे डायलिसीस सुविधेचा विस्तार

### लवकरच नि :शुल्क सेवा, नितीन गडकरी आणि कांचन गडकरी यांच्या हस्ते लोकार्पण

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**



गरीब व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील रुग्णांच्या सेवेसाठी समर्पित कमाल चौकातील स्व. भानुताई गडकरी मेमोरियल डायग्नोस्टिक सेंटर येथील डायलिसीस सुविधेचा विस्तार करण्यात आला आहे. आज, सोमवार, दि. २१ सप्टेंबर रोजी केंद्रीय रस्ते वाहतुक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी, कांचन गडकरी आणि सुप्रसिद्ध अस्थिरोगतज्ज्ञ डॉ. संजीव चौधरी यांच्या हस्ते या सुविधेचे लोकार्पण करण्यात आले. कमाल चौकातील या केंद्रामध्ये पूर्वी पाच रुग्णांचे डायलिसीस करण्याची सुविधा होती. आता दहा रुग्णांसाठी विस्तारीत सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. पाच नवीन डायलिसीस मशीन्स उपलब्ध झाल्यामुळे जास्तीत जास्त रुग्णांना याचा लाभ घेता येणार असल्याबद्दल गडकरी यांनी समाधान व्यक्त केले. विशेष म्हणजे लवकरच महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेंतर्गत रुग्णांना ही सुविधा निःशुल्क उपलब्ध करून देण्यात येणार आहे. डायलिसीससह याठिकाणी एमआरआय, सीटी स्कॅन, ईसीजी, मल-मूत्र तपासण्या, ईईजी, एक्स-रे, सोनोग्राफी, इको, स्ट्रेस टेस्ट या सुविधा देखील उपलब्ध आहेत. गेल्यावर्षी जुलैमध्ये लोकांच्या सेवेत आलेल्या या केंद्रातून आतापर्यंत हजारो रुग्णांनी अत्यल्प दरात सर्व सुविधांचा लाभ घेतला आहे.

या कार्यक्रमाला सारंग गडकरी, आमदार डॉ. राजीव पोतदार, डॉ. खापर्डे, प्रभाकरराव येवले, अविनाश घुशे, अतुल मंडलेकर, प्रकाश टेकाडे, संजय टेकाडे, हेमंत गडकरी, मनीष केडिया, दर्शन पांडे, डॉ. रोहित बडगे, डॉ. आस्था खेमका, डॉ. श्रीरंग वराडपांडे, मोहिनी खापर्डे, ओमप्रकाश इंगळे, दिनेश इळमे, डॉ. अभिजीत ढवळे, डॉ. वैभव बिसने, डॉ. तसलीम वसीम, स्नेहल गुल्हाने, सूरज पांडे, राम लाभे आदींची उपस्थिती होती.

## महिला,दिव्यांग व रोजगार इच्छुकांसाठी रोजगार मेळावा

### जिल्ह्यात २२ ठिकाणी मेळाव्यांचे आयोजन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

युवाशक्ती हीच राष्ट्रशक्ती या संकल्पनेला अनुसरून राज्य शासनातर्फे रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी रोजगार महाकुंभ महाराष्ट्र या महत्त्वपूर्ण उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागातर्फे दि. २९ सप्टेंबर २०२६ रोजी संपूर्ण राज्यात एकाच दिवशी व एकाच वेळी ५०० ठिकाणी रोजगार मेळावे आयोजित करण्यात येणार आहेत.

जिल्ह्यातील विविध शैक्षणिक संस्था, कौशल्य विकास केंद्रे, औद्योगिक संस्था व उद्योजक यांच्या संयुक्त विद्यमाने हे मेळावे घेण्यात येणार आहेत. रोजगार मेळावे आयोजित करण्यात येणारी ठिकाणे पुढीलप्रमाणे आहेत.

१.सिम्बॉयसिस स्किल डेव्हलपमेंट सेंटर, नागपूर, २) भालेराव विज्ञान कॉलेज, सावनेर,३) लेमदेव पाटील महाविद्यालय, कुही,४) जी.एच. रायसोनी स्किल टेक युनिव्हर्सिटी, नागपूर,५) तायवाडे कॉलेज, कोराडी, ६) ताई गोळवलकर महाविद्यालय, रामटेक, ७) टाटा स्ट्राइव्ह स्किल सेंटर, पारडी, नागपूर,
८) एम.आय.डी.सी. कौशल्य विकास केंद्र, बुटीबोरी, ९) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विदयापीठ, नागपूर, १०) रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ, नागपूर, ११) भिवापूर महाविद्यालय,भिवापूर
१२) सोनाताई पांडव पॉलिटेक्निक, काटोल, १३) झुलेलाल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी- कळउर, १४) महात्मा गांधी कला व वाणिज्य महाविद्यालय, पारशिवनी, १५) गुरुनानक कॉलेज ऑफ फार्मसी ) श्री पंढरीनाथ कला व वाणिज्य महाविद्यालय, नरखेड १७) शिवाजी विज्ञान महाविद्यालय, काँग्रेस नगर, नागपूर,१८) मौदा कॉलेज ऑफ फार्मसी,१९) बुटीबोरी मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन, २०) नूतन आदर्श कला, वाणिज्य आणि श्रीमती. एम.एच. वेगड सायन्स कॉलेज, उमरेड, जिल्हा, नागपूर, २१) मुलींचे / लक्ष्मीबाई केळकर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नागपूर- महिला विशेष मेळावा,
२२) संत जगनाडे महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, (दिव्यांग) नागपूर, येथे उमेदवारांकरिता दिव्यांग उमेदवारांकरिता मेळावे आयोजन करण्यात आलेले आहेत.

या रोजगार मेळाव्यांमध्ये विविध क्षेत्रातील नामांकित कंपन्या व उद्योजक सहभागी होणार असून विविध शैक्षणिक पात्रतेच्या उमेदवारांना या रोजगार मेळाव्यांमध्ये विविध उद्योग व आस्थापनांमधील उपलब्ध रिक्त पदांनुसार पुढील शैक्षणिक पात्रता असलेल्या उमेदवारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत.

# आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्यावर भर : राज्यमंत्री आशिष जयस्वाल

### एकात्मिक आरोग्य वर्धनी समितीची आढावा सभा संपन्न

**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**



राष्ट्रीय आरोग्य अभियान व राष्ट्रीय आयुष अभियानांतर्गत आयोजित एकात्मिक आरोग्यवर्धिनी समिती सभा सोमवार दिनांक २१ सप्टेंबर २०२६ रोजी रामटेक येथे राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली.

याप्रसंगी राज्यमंत्री आशिष जास्वाल म्हणाले, "रामटेकमध्ये दवाखाना आपल्या दारी आणि हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना या उपक्रमांच्या माध्यमातून नागरिकांना वेळेत आणि त्यांच्या जवळच आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याचा सातत्याने प्रयत्न सुरू आहे. दवाखाना आपल्या दारीच्या माध्यमातून प्रत्येक तालुक्यातील सुमारे दीड ते पावणेदोन लाख नागरिकांची आरोग्य तपासणी करून त्यांना आवश्यक उपचार व मार्गदर्शन मिळवून देण्यात आले आहे. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखानाच्या माध्यमातून सुमारे ४० ओपीडींची सुविधा उपलब्ध असून त्याचा अनेक नागरिकांना लाभ होत आहे.

रामटेकमधील जीर्ण अवस्थेत असलेल्या समाजभवनाच्या इमारतीचे पुनरुज्जीवन करून त्याठिकाणी आरोग्यसेवा उपलब्ध करण्यात आली असून, आज अनेक रुग्णांना त्याचा लाभ मिळत आहे. आता यापुढे माता व बाल आरोग्य सेवा, कुटुंब नियोजन व प्रजनन आरोग्य सेवा, नवजात व बाल आरोग्य सेवा, संसर्गजन्य रोगांचे व्यवस्थापन, असंसर्गजन्य रोगांचे व्यवस्थापन, मानसिक आरोग्य सेवा, वृद्ध आरोग्य सेवा, मुख आरोग्य सेवा, नेत्र आरोग्य सेवा, आपत्कालीन वैद्यकीय सेवा, नाक-कान-घसा आरोग्य सेवा, पॅलिएटिव्ह केअर तसेच आघात व जखमी रुग्णांसाठी आवश्यक सेवा या सर्व सेवा प्रभावीपणे उपलब्ध करून देण्यावर भर राहणार आहे.

नागरी तसेच ग्रामीण भागातील प्रत्येक नागरिकाला उत्तम आरोग्यसेवा उपलब्ध व्हावी, यासाठी विविध माध्यमांतून सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. जिल्हा खनिज प्रतिष्ठानच्या निधीतून सुमारे ४ कोटी रुपये खचार्ची अत्याधुनिक आरोग्य तपासणी बस उभारण्यात येत असून, या माध्यमातून विविध प्रकारच्या आरोग्य तपासण्या, सोनोग्राफीसह आवश्यक निदान सुविधा नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचे काम केले जाणार आहे.

नागरिकांनीही आपल्या आरोग्याकडे गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे. रक्तदाब, मधुमेह तसेच इतर आजारांकडे दुर्लक्ष न करता वेळोवेळी आरोग्य तपासणी करून घेणे गरजेचे आहे. विशेषतः रक्तदाबाची औषधे वेळेवर न घेतल्यास गंभीर गुंतागुंत होऊन पक्षाघात किंवा हृदयविकाराचा झटका येण्याचा धोका वाढू शकतो. त्यामुळे आजाराचे लवकर निदान आणि वेळेवर उपचार हे निरोगी व दीर्घ आयुष्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत.

यावेळी नगराध्यक्ष बिकेंद्र महाजन, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी माधुरी काळे, तालुका आरोग्य अधिकारी, रामटेक डॉ. स्मिता काकडे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. संजय वाघमारे, नगरसेवक माणिक ताकोत आदी उपस्थित होते.

## जागतिक पर्यटन दिनानिमित्त ज्येष्ठांना २० टक्के सवलत

### एमटीडीसीतर्फे २७ सप्टेंबर रोजी विविध उपक्रमांचे आयोजन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

जागतिक पर्यटन दिनानिमित्त महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने (एमटीडीसी) पर्यटकांसाठी विविध उपक्रमांसोबतच ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष सवलत जाहीर केली आहे. महामंडळाच्या पर्यटक निवासांमध्ये सोमवार ते गुरुवार ज्येष्ठ नागरिकांना २० टक्के सवलत मिळणार आहे. याशिवाय शासकीय कर्मचारी, दिव्यांग आणि माजी सैनिकांसाठीही विविध सवलती उपलब्ध आहेत. या सवलतींचा लाभ घेण्याचे आवाहन एमटीडीसीचे वरिष्ठ प्रादेशिक व्यवस्थापक दिनेश पाटील यांनी केले आहे.

व्यवस्थापकीय संचालक निलेश गटणे यांच्या सूचनेनुसार २७ सप्टेंबर रोजी महामंडळाच्या प्रादेशिक कार्यालयांसह पर्यटक निवास, उपहारगृहे, बोट क्लब, कलाग्राम आदी ठिकाणी जागतिक पर्यटन दिन साजरा करण्यात येणार आहे. यंदाची संकल्पना डिजिटल अजेंडा आणि कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारे पर्यटनाची पुनर्रचना असून, त्यानिमित्त २८ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता एमटीडीसी हॉटेल, वेस्ट हायकोर्ट रोड, सिव्हिल लाइन्स येथे तज्ज्ञांच्या सहभागाने परिसंवाद आयोजित करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांसाठी निबंध व चित्रकला स्पर्धा, तर पर्यटकांसाठी पारंपरिक खेळ, नेचर वॉक, जंगल ट्रेल, हेरिटेज वॉक आणि बर्ड वॉचिंग यांसारखे उपक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. पर्यटक निवासांमध्ये येणाऱ्या पर्यटकांचे पारंपरिक पद्धतीने स्वागत करण्यात येणार असून, विविध पर्यटनस्थळांची माहितीही दिली जाणार आहे. अधिक माहितीसाठी ०७१२-२५३३२५ या क्रमांकावर श्रीमती पूजा कांबळे यांच्याशी किंवा ronagpur@ maharasht ratourism. gov.in या ई-मेलवर संपर्क साधता येईल.

# एनडीआरएफकडून विद्यार्थ्यांना आपत्ती व्यवस्थापनाचे प्रत्यक्ष धडे

### नांदच्या पीएमश्री शाळेत विशेष प्रशिक्षण शिबिर, आग-भूकंप, प्रथमोपचार व बचावकार्याचे प्रात्यक्षिक

**दै. सिंहवाणी वृत्त, नांद**
**अखिल रोडे**




आपत्तीच्या प्रसंगी घाबरून न जाता स्वतःचे तसेच इतरांचे प्राण कसे वाचवावेत, याबाबत राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल यांच्या वतीने पीएमश्री जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, नांद क्र. २ (मुली) येथे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्यात आले. गटग्रामपंचायत नांद येथील समाजभवन परिसरात आयोजित या विशेष प्रशिक्षण शिबिरात विद्यार्थ्यांसह शिक्षक व नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

NDRF बटालियन प्रमुख प्रमोद कुमार मिश्रा यांच्या मार्गदर्शनाखाली पथकातील प्रशिक्षित जवानांनी विविध आपत्कालीन परिस्थितींमध्ये करावयाच्या उपाययोजनांचे प्रात्यक्षिक करून दाखविले. भूकंपाच्या वेळी डोकं झाका, बाकाखाली बसा व सुरक्षित राहा तसेच आगीच्या वेळी थांबा, खाली पडा आणि लोळा या सुरक्षितता तंत्रांची माहिती देण्यात आली.

यावेळी जखमी व्यक्तींना सुरक्षित ठिकाणी हलविणे, मानवी साखळी तयार करणे, स्ट्रेचर तयार करून बचावकार्य करणे आदींचेही प्रात्यक्षिक घेण्यात आले. तसेच पूरस्थिती आणि ढिगारा हटविण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या विविध आधुनिक बचाव उपकरणांची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली.

**सीपीआर व प्रथमोपचाराचेही प्रशिक्षण**

आपत्कालीन परिस्थितीत प्रथमोपचार व सीपीआरचे महत्त्व याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. व्यक्ती बेशुद्ध पडल्यास किंवा हृदयाची क्रिया थांबल्यास तातडीने मदत कशी करावी, गंभीर रक्तस्राव कसा नियंत्रित करावा आणि तात्पुरती पट्टी कशी बांधावी, याचे प्रात्यक्षिक एनडीआरएफ जवानांनी करून दाखविले.

या प्रशिक्षणात विद्यार्थ्यांनी केवळ प्रेक्षक न राहता विविध प्रात्यक्षिकांमध्ये प्रत्यक्ष सहभाग घेतला. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आपत्तीच्या प्रसंगी संयमाने व धैयार्ने परिस्थिती हाताळण्याचा आत्मविश्वास निर्माण झाला.

कार्यक्रमाच्या शेवटी मुख्याध्यापिका कविता चव्हाण यांनी एनडीआरएफ पथकाचे आभार मानले. यावेळी सरपंच शितल राजूरकर, उपसरपंच मोहन धारणे, केंद्रप्रमुख कुशल रोडे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष राहुल चुटे, गणेश कोवे, ग्रामपंचायत सदस्य विलास रुईकर, नांद हायस्कूलचे मुख्याध्यापक सुरेश लोहारे, मुख्याध्यापिका कुंदा घोडमारे, शिक्षक शिला बहादुरे, सुभाष नन्नावरे, वनिता पडगेलवार, हंसराज जाधव, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन शिक्षक सुभाष नन्नावरे यांनी केले.

या प्रशिक्षणातून 'आपदा सेवा सदैव सर्वत्र' या एनडीआरएफच्या ब्रीदवाक्याचा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचला.


अतुल व रूनाली कळमकर, विहीरगाव, नागपूर


श्री साई क्रीडा मंडळ, गणेशनगरचा राजा,नंदनवन नागपूर


राजेंद्र महाडिक व परिवार, हुडकेश्वर रोड, नागपूर


वक्रतुंड गणेशोत्सव मंडळ, लाडीकर ले-आउट, मानेवाडा रोड


युवा समाजसेवी शुभम गणपतराव ढवळे, सावनेर


हितज्योती आधार फाऊंडेशनचे संस्थापक हितेश बनसोड यांच्या घरचे गणराया


महाराष्ट्र राज्य लॉटरी विक्रेता सेनेचे संस्थापक अध्यक्ष विलास सातार्डेकर यांच्या कणकवली येथील गावातील निवासस्थानी सालाबादप्रमाणे श्री गणरायाची स्थापना करण्यात आली असून विलास सातार्डेकर आणि संपूर्ण कुटुंबियांनी मनोभावे पूजा केली आहे. सुंदर मुर्ती आणि आकर्षक सजावट या गणेशोत्सवामध्ये गणेश भक्तांचे लक्ष केंद्रित करत आहेत.

## कॅनडात विराजमान 'बाप्पा'



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
गणेशोत्सव आपल्या देशात थाटामाटात, आनंद आणि उत्साहात साजरा होतोच. मात्र देशाबाहेरही गणेशोत्सवाचा आनंद काही कमी नसतोच.
कॅनडातील व्हँकूव्हर येथे वास्तव्यास असलेले धनश्री अरूण लंघे यांचे कुटूंब दरवर्षी अगदी थाटात गणरायाची स्थापना करतात. मागील अनेक वर्षांपासूनची ही परंपरा त्यांनी जपली असून गणरायाच्या विसर्जनापर्यंत दररोज आरतीसह अगदी विधीवत पूजाअर्चा केली जाते.

# विवेकानंद नगर गणेशोत्सव मंडळाकडून मुख्यमंत्री सहाय्यता निधीला १.०१ लाखांची मदत

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे धनादेश सुपूर्द, सामाजिक उपक्रमातून मंडळाची नवी वाटचाल

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
विवेकानंद नगर गणेशा उत्सव सांस्कृतिक सेवा ट्रस्टच्यावतीने मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी १ लाख १ हजार रुपयांचा धनादेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. गणेशोत्सव मंडळाच्या सामाजिक बांधिलकीच्या उपक्रमातून ही मदत देण्यात आली.



गुरुवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे नागपुरातील प्रसिद्ध डिजीटेलंड येथे भेटीसाठी आले असता, भेटी दरम्यान मंडळाचे अध्यक्ष महेश भिंगारे यांनी मंडळाच्यावतीने मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी १ लाख १ हजार रुपयांचा धनादेश मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे सुपूर्द केला. गणेशोत्सव मंडळाच्या माध्यमातून सामाजिक क्षेत्रात अशा प्रकारचे योगदान देण्याची ही पहिलीच वेळ असून, या उपक्रमातून मंडळाने सामाजिक कार्याची नवी वाटचाल सुरू केली आहे. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी मंडळाच्या उपक्रमाचे कौतुक करून आगामी सामाजिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.
याप्रसंगी प्रभागाच्या नगरसेविका वर्षाताई चौधरी, दक्षिण- पश्चिम मंडळाचे अध्यक्ष विनोद शिंदे, गजानन निषिदकर यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी अर्थव भिंगारे, आर्यन एकबोटे, प्रणय हाडके, अक्षय लकुडकर, अनर्व गाडेकर, दुबे, हाडके तसेच विवेकानंद नगर परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चर्चासत्रातून गणपती बाप्पाच्या भक्तांनी अपघातमुक्त जीवन जगण्याची कला शिकली

### "चल मित्रा, आणीबाणीच्या प्रसंगी मला काही बोलू दे", बजाज नगर युवक गणेशोत्सव मंडळात चर्चा



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
चॉकलेट कोणाला आवडत नाही? लहान मुलांपासून ते वृद्धांपर्यंत सर्वांनाच ते आवडते. तुम्ही पैसे देऊन हवे तितके चॉकलेट विकत घेऊ शकता, पण बक्षीस म्हणून ते मिळणे ही काही साधी गोष्ट नाही. रोडमार्क फाउंडेशनने राबवलेल्या 'चला दोस्त हो, अपघटावर बोलू कहीं' या मोहिमेदरम्यान आम्ही याचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. रस्ते सुरक्षेवरील काही प्रश्नांची उत्तरे दिल्याबद्दल लहान मुलांना बक्षीस म्हणून दिलेल्या चॉकलेट्समुळे त्यांच्या निरागस चेहऱ्यावर हास्य फुलले.
गणपती बाप्पाच्या आशीवार्दाने लोकांमध्ये रस्ते सुरक्षेची भावना जिवंत ठेवणे हे रोडमार्क फाउंडेशनचे सर्वोच्च प्राधान्य आहे. याच उद्देशाने, शनिवार, १९ सप्टेंबर रोजी सायंकाळी, संस्थेचे अध्यक्ष राजेश वाघ यांच्या नेतृत्वाखाली संस्थेचे पथक बजाज नगर बास्केटबॉल मैदानावर पोहोचले. दर्शनासाठी आलेल्या भक्तांचा उत्साह शिगेला पोहोचला होता. आपल्या लाडक्या बाप्पाचे दर्शन घेण्यासाठी मोठ्या संख्येने भक्त उपस्थित होते.
बजाज नगर युवक गणेशोत्सव मंडळ गेल्या ३४ वर्षांपासून मोठ्या प्रमाणावर गणेशोत्सवाचे आयोजन करत आहे. दरवर्षी वेगवेगळ्या संकल्पनेनुसार गणपतीची पूजा केली जाते. यावर्षी सजावट प्रसिद्ध मराठी चित्रपट 'तुम्बाड'च्या पार्श्वभूमीवर करण्यात आली आहे. बाप्पाचे रूप अत्यंत मनमोहक आहे.
दरम्यान, रोडमार्क फाउंडेशनचे चर्चासत्र सुरू झाले. गर्दी इतकी मोठी होती की, काय चालले आहे हे जाणून घेण्यासाठी प्रत्येकजण उत्सुक होता.
चर्चासत्राला सुरुवात झाली. फाउंडेशनचे अध्यक्ष राजेश वाघ, बजाज नगर युवा गणेशोत्सव मंडळाचे अधिकारी आणि अपघातातून बचावलेले आनंद मथणकर, बजाज नगर सांस्कृतिक क्रीडा मंडळाचे अध्यक्ष जयंतराव आदम आणि नूतन भारत युवक संघाचे सचिव संदीप दुरुगकर यांच्यात रस्ते अपघातांवर गंभीर चर्चा झाली.
राजेश वाघ यांनी देशातील अपघातांच्या परिस्थितीवर प्रकाश टाकला आणि त्यावर चर्चा करणे व उपाययोजना करणे का महत्त्वाचे आहे हे स्पष्ट केले. वाहतूक सिग्नलकडे दुर्लक्ष करणे, अतिवेग, वाहन चालवताना हेल्मेट आणि सीटबेल्ट न वापरणे, तसेच मोबाईल फोनचा वापर या सर्व गोष्टी कशा जीवघेण्या ठरू शकतात, यावर प्रश्नांमध्ये भाष्य करण्यात आले.
गेल्या १२ वर्षांपासून अपघात बचावकार्यात अनेकांचे प्राण वाचवणारे आनंद मथणकर म्हणतात की, लोक अनेकदा घाईत असतात, जे अपघातांचे एक प्रमुख कारण आहे. त्यांनी पीडितांना मदत करण्यासाठी पुढे येण्याचे आवाहनही केले.
बजाज नगर सांस्कृतिक क्रीडा मंडळाचे अध्यक्ष जयंतराव आदमणे यांनी चालकांसाठी ट्रिपल-सीट रायडिंग किती धोकादायक आहे यावर प्रकाश टाकला. त्यांनी तरुणांबद्दल विशेष चिंता व्यक्त केली, कारण ट्रिपल-सीट रायडिंगचा धोका पत्करणारे बहुतेक तरुणच असतात. नूतन भारत युवक संघाचे सचिव संदीप दुरुगकर यांनीही निदर्शनास आणून दिले की, बहुतेक दुचाकी चालक हेल्मेटकडे दुर्लक्ष करतात, जे अपघाताच्या वेळी अत्यंत धोकादायक ठरते.
"चला दोस्त हो, अपघटावर बोलू कही" या मोहिमेद्वारे रस्ते अपघातांची कारणे आणि प्रतिबंधात्मक उपायांबद्दल माहिती देण्यात आली. अतिवेग, हेल्मेट आणि सीट बेल्टकडे दुर्लक्ष करणे, वाहन चालवताना मोबाईल फोन वापरणे आणि वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणे यांसारख्या समस्यांकडे नागरिकांचे लक्ष वेधण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी, उपस्थित नागरिकांनी वाहतुकीचे नियम पाळण्याची आणि स्वतःच्या तसेच इतरांच्या सुरक्षिततेची खात्री करण्याची शपथ घेतली. रोडमार्क फाऊंडेशनने हा संदेश दिला की, रस्ते सुरक्षा ही केवळ पोलीस किंवा प्रशासनाची जबाबदारी नसून, ती प्रत्येक रस्ता वापरकर्त्याची सामूहिक जबाबदारी आहे. एक छोटीशी खबरदारी एका कुटुंबाला आयुष्यभराच्या त्रासापासून वाचवू शकते. रस्ते सुरक्षेचा संदेश पसरवण्यासाठी गणेशोत्सवासारख्या सार्वजनिक आणि मोठ्या जनसमुदायांचा एक प्रभावी माध्यम म्हणून उपयोग करण्याचा उपक्रम हे या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य होते. सारिका वाघमारे, दीपा गेदाम, निलेश पाटील, गणेश ठाकरे आणि शिबा शेख यांनी कार्यक्रमाच्या यशामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली.

# प्रज्ञाचक्षु गुलाबराव महाराज: अव्दितीय विद्वत्ता आणि संतत्व

**शशिकांत तोटे**
**दारव्हा, जि.यवतमाळ**

महाराष्ट्राच्या थोर संत परंपरेतील अलीकडच्या काळातील 'ज्ञानेशकन्या' म्हणून संत ज्ञानेश्वरांच्या तत्व चिंतनाला जीवन समर्पित करणारे संत गुलाबराव महाराज होय. त्यांचा जन्म सन१८८१ला आजोळघरी लोणी टाकळी,जि. अमरावती येथे गोंडूजी आणि आलोकाबाई मोहोड या दांपत्याच्या पोटी झाला.वयाच्या नवव्या महिन्यातच त्यांच्या डोळ्याला जंतूसंसर्ग झाल्यामुळे अंधत्व आले. संत भूतलावर जन्म घेतात ते जीवांच्या कल्याणासाठी,त्यांना लाभलेले आयुष्य जरी कमी असले तरी समाजाप्रतीचे योगदान अफाट व अतुलनिय असते. संतांचा जीवनक्रम आणि कार्याची भिन्नभिन्न वैशिष्ट्ये असतात.
संत गुलाबराव महाराजांना 'ज्ञानेशकन्या' आणि 'प्रज्ञाचक्षु' या संबोधनाने ओळखल्या जातात. श्रीकृष्णाच्या प्रेमात रममान झालेले व संत ज्ञानेश्वरांच्या वां ग्मयावर अफाट प्रेम करणारे गुलाबराव महाराज स्वतःला ज्ञानेशकन्या मानतात.तर दुसरे प्रज्ञाचक्षु म्हणजे अशी व्यक्ती जी जन्मानंतर आंधळी झालेली असली तरी बुद्धीच्या आणि बुद्धिमत्तेच्या बळावर सर्व गोष्टींचे मर्म जाणतो अशांना प्रज्ञाचक्षु म्हणतात. हाच स्वरूपधर्म संत गुलाबराव महाराजांच्या बाबतीत तंतोतंत लागू होते.
संत गुलाबराव महाराजांचा जीवनपट बघता अतिशय प्रतिकुल परिस्थितला आहे.नऊ महिन्याचे असताना त्यांच्या डोळ्याला जंतू संसर्ग झाल्यामुळे त्यांना कायमचे अंधत्व आले. वयाच्या चौथ्या वर्षी आई वारली. पुढे लोणी टाकळीहून माधान येथे आले.त्यांच्यात थोर प्रज्ञाशक्ती त्यांच्या प्रगट झाली. त्या बळावरच पुरातन ग्रंथांचे आकलन ते सहज करीत गेले. मनकर्णिका सोबत विवाह झाला. लक्ष्मण भटांकडून संस्कृत ग्रंथ ऐकून पाठांतर केले. त्यांनी आकलन, शब्द रूपावली, लघु व्याकरण ही ग्रंथे मुखद्गत करून त्यांनी संस्कृत भाषेतही प्रवेश मिळविला. इतर धर्मांचे ग्रंथांचे श्रवण त्यांनी केले. अल्पावधीत संस्कृत पंडित झाले. जन्मतः अंध असताना; कुठलेही शिक्षण नसताना श्रवण पाठांतराच्या बळावर विपुल ग्रंथ लेखन इतराकरवी करून घेतले, हे मोठे विलक्षण वाटते.
मराठी, हिंदी, संस्कृत भाषेवर त्यांचे कमालीचे प्रभुत्व होते. गुलाबराव महाराजांनी काव्यशास्त्र, आयुर्वेद, संगितासह अनेक भाषेसोबतच बोली भाषेत अनेक विषयांवर विपुल लेखन केले आहे. सूत्रग्रंथ,भाष्य, प्रकरण, आत्मचरित्र,आख्यान, नाटक, लोकगीते, स्तोत्र, व्याकरण,कोश, आदी वाङ्मय प्रकार त्यांनी हाताळले.सहस्त्र ओव्या, श्लोकांची निर्मिती त्यांनी केली. अलौकिक व्याख्याने.. धर्म समन्वय... प्रेम निकुंज.. योग प्रभाव.. साधूबोध ही त्यांची प्रचलित पुस्तके होय. महाराजांच्या ग्रंथसंपदेचे जतन करण्याचे कष्ट डॉ. राम पंडितांनी केले होते.
एकही वर्ग शाळा न शिकलेले संत गुलाबराव महाराज एका विलक्षण बुद्धीच्या बळावर अलीकडच्या शास्त्रज्ञांच्या सिद्धांतावर त्यांनी अभ्यास केला. त्यामध्ये डार्विनचा उत्क्रांतीवाद,



आईन्स्टाईनचा अणुसिद्धांत, जगदीशचंद्र बोस यांचे वनस्पतीशास्त्र या सर्वांचा सखोल अभ्यास करून सटीक लेखन करून ठेवले.संत गुलाबराव महाराजांचे कार्य ज्ञान, विज्ञान, धर्म,संस्कृती एवढ्या पुरतेच मर्यादित नसून त्यांनी साधुबोध या ग्रंथातून मानवी जीवनाचा उद्धार कसा होईल याचे विवेचन सुद्धा केले आहे. प्रपंच आणि परमार्थ या दोन्हीची सांगड घालून जीवन कसे जगावे? याचे अनमोल मार्गदर्शन लाभलेले आहे.
पावसाच्या पाण्यावर जो शेतकरी अवलंबून राहील त्याची पूर्णतः प्रगती आयुष्यात कधी होणार नाही. पाण्याचा अभाव असताना त्याला तांत्रिक पद्धतीने पाण्याच्या शेतीसाठी उपयोग करून घेता येईल, तोच शेतकरी विकासाच्या वाटेने मार्गस्थ होईल. असे ते स्पष्टपणे मांडतात.
वेदांतकेसरी बाबाजी महाराज पंडित या शिष्यावर त्यांचे प्रचंड प्रेम होते.त्यांनी महाराजांची ग्रंथसंपदा जतन केली. त्यांचा ग्रंथसंग्रह आजही अमरावतीच्या परकोटीच्या आत दहिसाथीत असलेल्या संत ज्ञानेश्वर महाराजांच्या मंदिरात सुरक्षितपणे जपून ठेवल्याचे सांगितले जाते. संत ज्ञानेश्वर महाराजांचा फेटा घातलेले पहिले तैलचित्र अकोल्याच्या चित्रकारांकडून गुलाबराव महाराजांनी करून घेतले होते. ते तैलचित्र आजही आळंदीच्या संजीवन समाधी मंदिराच्या गाभाऱ्यात दर्शनी भागावर आहे.
हे महाराष्ट्रासाठी सर्वात मोठी देणगी आहे. असा हा तत्वज्ञानी समाजाला तत्त्वचिंतनाचे दान सपूर्द करून वयाच्या चौत्तीसाव्या वर्षी जगाचा निरोप घेतला. आज भाद्रपद शुक्ल द्वादशी पुण्यस्मरण दिनाच्या प्रसंगी महात्म्याला शब्दसुमनें समर्पित करुया..!
- ९१३०८३५४५८

थोडक्यात

## ५००-६०० बनावट रजिस्ट्रींचा आरोप, तात्काळ विभागीय चौकशी करा!

**नोंदणी उपमहानिरीक्षक तथा मुद्रांक उपनियंत्रक, नागपूर विभाग येथे युवक काँग्रेसचे निवेदन**



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

दुय्यम निबंधक कार्यालय क्र. ५ तसेच इतर कार्यालयांमध्ये बनावट/डुप्लिकेट RL, NA, नगररचना नकाशा व Sanction Map यांच्या आधारे ५००-६०० बनावट दस्तनोंदणी झाल्याचा गंभीर आरोप महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसने केला आहे. या प्रकरणाची तात्काळ विभागीय व निष्पक्ष चौकशी करून मूळ शासकीय अभिलेखांशी कागदपत्रांची पडताळणी करावी. तसेच CCTV व डिजिटल रेकॉर्ड सुरक्षित ठेवून सब रजिस्ट्रार कृष्णा राऊत यांच्यासह सर्व संबंधितांची भूमिका तपासावी, अशी मागणी करण्यात आली. याबाबतचे बनावट शिक्के असलेल्या पुराव्यासह निवेदन नोंदणी उपमहानिरीक्षक तथा मुद्रांक उपनियंत्रक, नागपूर विभाग यांना साद करण्यात आले. चौकशीत गैरप्रकार अथवा बनावट कागदपत्रांचा वापर सिद्ध झाल्यास कृष्णा राऊत यांच्यासह सर्व दोषींवर तात्काळ फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी युवक काँग्रेसने केली आहे.

प्रशासनाने तातडीने विभागीय चौकशी करून कारवाई केली नाही, तर महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसच्यावतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला. निवेदन देताना महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे महासचिव अक्षय हेटे, सुशांत लोखंडे, रजा अली, समीर तिमांडे, आशुतोष कांबळे, शिवम चौधरी, साहिल मोहोड, अनुप भंडारी यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

## बॉम्बे आर्ट सोसायटीला बळ देण्यासाठी व अनियमततेच्या विरोधात "संकल्प पॅनेल"




**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई**

'बॉम्बे आर्ट सोसायटी' या १८८८ साली स्थापन झालेल्या कला संस्थेच्या नवीन कार्यकारिणीसाठी दि. ३ ऑक्टोबर २०२६ रोजी निवडणुक होत आहे. बॉम्बे आर्ट सोसायटीला बळ देण्यासाठी व अनियमततेच्या विरोधात एकत्र येत अनेक सभासदांच्या मागणीनंतर "संकल्प पॅनेल" २६ कलमी वचनबध्द कार्यक्रम जाहीर करीत निवडणुकीसाठी उतरले आहे. विद्यमान पदाधिकारी सुमारे १५ वर्षांपासून कार्यरत आहेत मात्र गेल्या काही वर्षांपासून या संस्थेने, अनेक स्थित्यंतरे, अडी-अडचणी, चढ-उतार आणि बरेच कांही कटु सत्य अनुभवलेले आहेत. प्रस्थापितांना विरोध करण्यासाठी आणि प्रत्येक सजग कलाकाराच्या कला प्रज्ञेला उर्जा देण्याच्या इराद्याने प्रामाणिक, पारदर्शक विचारांचे संस्कार असलेल्या आजीव सदस्यांनी, संस्थेचे "पुनरुज्जीवन" करण्याचा संकल्प यावेळी केलेला आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवरील मोठी कला संस्था असलेल्या या संस्थेला पुन्हा उदयास आणून भारतीय संस्कृतीचा "आयकॉन" बनवण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याची जिद्द यातून दिसून येत आहे.

२००२ पर्यंत ही संस्था जहांगीर आर्ट गॅलरीच्या एका छोट्याशा खोलीत बंदिस्त होती. आता अध्यक्ष पदासाठी निवडणूक लढविणाऱ्या विजय राऊत यांच्या नेतृत्वाखालील त्यावेळी नविन दमाच्या पॅनेलला यश मिळाल्यानंतर २०१० पर्यंत या पॅनलमधील लोकांनी या संस्थेचा कायापालट करण्याचा प्रयत्न केला होता. म्हाडाने काढून घेतलेला प्लॉट परत आणण्यापासुन ते बांद्रा येथील कलासंकुलाचे काम, लाइफ टाईम ॲवॉर्डसह इतरही महत्त्वाच्या ॲवॉर्डसची संख्या वाढवून सोसायटीच्या वार्षिक कला प्रदर्शनाच्या समारंभाच्या वेळी प्रदान करण्यास सुरुवात केली होती. हौशी आणि युवा कलावंतांसाठी नियमित, दजेर्दार कला-प्रकाशने व डिजिटल पोर्टफोलिओ प्रकाशन,

कला सर्वसामान्यांपर्यंत नेण्यासाठी इतर शहरात कला-उत्सव आणि शिबिरांचे आयोजन, साहित्य संमेलनाच्या धर्तीवर देश-विदेशात वार्षिक भव्य कला संमेलन आणि परिसंवादाचे आयोजन, कला शिक्षण पद्धतीतील बदलांबाबत सरकार दरबारी पाठपुरावा आणि जागरूकता यासाठी शिक्षण सुधारणा, महिला कलावंतांसाठी स्वतंत्र विशेष प्रदर्शन आणि हक्काचे व्यासपीठ, ज्ञान-संवाद होण्यासाठी ज्येष्ठ आणि विशेष कलावंतांची प्रात्यक्षिके आणि विचारवंतांची व्याख्याने, राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय देवाण-घेवाण होण्याच्या दृष्टीकोनातून देश-विदेशातील आर्ट गॅलरीजसोबत टाय-अप आणि कलाकार निवासी (फीश्रील्लू८) कार्यक्रम ट्रस्टचा सर्व निधी योग्य व विहित मार्गाने जास्तीत जास्त वाढवून त्याचा कला व कलाकारांच्या हितासाठी वापर, सर्व सभासदांचे पाच वर्षातून एखादे चित्र प्रदर्शनाचे आयोजन करण्यात येईल, बॉम्बे आर्ट सोसायटी आर्ट फेस्टिवल सुरू करण्याची प्रथा निर्माण केली जाईल, संस्थेचे अद्ययावत ग्रंथालय, कला संग्रहालय, आणि प्रतिथयश कलाकारांसह दुर्मिळ कलाकृतींच्या लिलावाचे काही सेवा-शर्ती-नियम-अटींच्या अधीन राहूनआयोजन करणे असा सकारात्मक आणि महत्त्वाकांक्षी उपक्रमांचा प्राधान्याने विचार करीत २६ कलमी कार्यक्रम जाहीर करीत प्रा. विजय राऊत (अध्यक्ष)- अमरावती, डॉ. गजानन सिताराम शेपाळ (सचिव) प. महाराष्ट्र यांनी "अनियमिततेला नियमित करून कायद्याच्या चौकटीत बद्ध करण्यासाठी १३८ वर्षांच्या सार्वजनिक न्यास असलेल्या बॉम्बे आर्ट सोसायटी या कलासंस्थेला बळ देण्यासाठी आणि नवसंजीवनी बहाल करण्यासाठी नवनिर्मितीचा संकल्प जाहीरनामा घेऊन "संकल्प पॅनेल" कला आणि कलावंतासाठी ठोस कृती कार्यक्रम घेऊन पुढे आली आहे, असे आवाहन केले आहे.

# गरोदर मातांच्या जेवणात अळ्या

## सुभाषचंद्र बोस शासकीय उपजिल्हा उपजिल्हा रुग्णालय तुमसर येथील भोंगळ कारभार

**दै. सिंहवाणी वृत्त, तुमसर**

भंडारा जिल्ह्यातील तुमसर येथील सुभाषचंद्र बोस शासकीय उपजिल्हा रुग्णालयातील भोंगळ कारभार पुन्हा एकदा समोर आला आहे. रविवारी गरोदर मातांच्या वार्डात पुरवण्यात आलेल्या अन्नामध्ये अळ्या निघाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. रुग्णांच्या जिवाशी खेळणाऱ्या या गंभीर प्रकारामुळे रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, रुग्णालयात उपचार घेत असलेल्या गरोदर महिलांना रविवारी नेहमीप्रमाणे आहार पुरवण्यात आला. मात्र, जेवण करत असताना वरण आणि भातात अळ्या असल्याचे रुग्णांच्या नातेवाईकांच्या निदर्शनास आले. नातेवाईकांनी तातडीने हा दूषित आहार रुग्णालयाच्या मुख्य कार्यालयात नेऊन उपस्थित डॉक्टरांना दाखवला.

डॉ. आयुषी कुंजेकर यांनी तो आहार आपल्या ताब्यात घेतला असला, तरी रुग्णालयातील निकृष्ट दर्जाच्या अन्नाबाबत रुग्ण प्रशासनाकडे सातत्याने तक्रारी करत असूनही त्याकडे दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप रुग्णांनी केला आहे. कंत्राटदाराच्या या निष्काळजीपणामुळे रुग्णांच्या जीवाशी खेळ सुरू असल्याचे स्पष्ट झाले असून याप्रकरणी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संदीप गजभिये यांच्याकडे थेट तक्रार करण्यात आली आहे. सरकारी रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या गरोदर मातांना अशा प्रकारे अस्वच्छ आणि किडलेले अन्न पुरवले जात असल्याने रुग्णांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

आता प्रशासनाकडून संबंधित कंत्राटदारावर खरोखरच कठोर कारवाई होणार की नाही याकडे सर्व जनतेचे लक्ष लागले आहे.

> या प्रकरणाची संपूर्ण माहिती घेऊन चौकशी केली जाईल. दोषी कंत्राटदारावर दंडात्मक आणि योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल.
>
> **- डॉ. संदीप गजभिये, जिल्हा शल्य चिकित्सक, भंडारा**

## सोनुर्लीतील जुगार अड्डयावर पोलिसांचा छापा : ६.७६ लाखांचा मुद्देमाल जप्त

**दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर (धनंजय पांढरे)**

महाराष्ट्र-तेलंगणा सीमेवरील सोनुर्ली येथील विनर्स सोशल क्लबमध्ये सुरू असलेल्या तीन पत्तीच्या जुगार अड्डयावर पोलिसांनी छापा टाकून ३९ जुगाऱ्यांसह क्लबच्या मॅनेजरला ताब्यात घेतले. या कारवाईत रोख रक्कम, जुगाराचे साहित्य, पत्ते, प्लास्टिक कॉईन, पैसे मोजण्याचे मशीन, हिशोबाची कागदपत्रे आणि मोबाईल असा एकूण ६ लाख ७६ हजार ४७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

सहायक पोलीस अधीक्षक कुमार सुशांत यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. विरूरचे ठाणेदार रामदास गायकवाड, बल्लारपूर पोलीस ठाण्यातील गुन्हे शोध पथकाचे पोलीस उपनिरीक्षक उमेश जोगदंड तसेच विरूर व बल्लारपूर पोलीस ठाण्याचे सुमारे २५ ते ३० पोलीस अधिकारी व अंमलदार या कारवाईत सहभागी झाले होते.

२० सप्टेंबर रोजी सायंकाळी ७.२५ वाजता पोलिसांनी सोनुर्ली येथील विनर्स सोशल क्लबवर छापा टाकला. बंदिस्त हॉलमध्ये १५ टेबलांवर तसेच खाली व उभे



राहून अनेक जण तास पत्त्यांवर पैशांची बाजी लावताना आढळून आले. पोलिसांना पाहताच काही जण अंधाराचा फायदा घेत पसार झाले. घटनास्थळी मिळून आलेल्या व्यक्तींची पंचांसमक्ष अंगझडती घेतली असता ५६ हजार ७१० रुपये रोख मिळाले. त्यानंतर क्लबच्या मॅनेजरच्या कॅबिनमधील लोखंडी कपाटातून ५ लाख ८ हजार रुपये, तर स्वागत कक्षातील ड्रॉवरमधून ८४ हजार ४०० रुपये जप्त करण्यात आले.

याशिवाय विविध रंगांचे प्लास्टिक कॉईन, पत्त्यांची बंडले, कॅल्क्युलेटर, पैसे मोजण्याचे मशीन, जुगाराचे हिशोब व दैनंदिन व्यवहाराची कागदपत्रे तसेच मॅनेजरचा मोबाईल असा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला.

**मोबाईल तपासणीत ऑनलाइन व्यवहारांचा उलगडा होणार?**

या कारवाईत जप्त करण्यात आलेले आरोपी आणि क्लबच्या मॅनेजरचे मोबाईल या प्रकरणातील तपासासाठी महत्त्वाचे ठरण्याची शक्यता आहे. मोबाईलमधील वढक व्यवहार, बँकिंग ॲप्स, संदेश, कॉल रेकॉर्ड तसेच जुगाराच्या व्यवहारांशी संबंधित डिजिटल नोंदी तपासल्या जाण्याची शक्यता आहे. या तपासातून क्लबमध्ये ऑनलाइन पद्धतीने किती रुपयांचे व्यवहार झाले, कोणाकडून पैसे स्वीकारण्यात आले आणि कोणाकडे पाठविण्यात आले, याचा मागोवा लागण्याची शक्यता आहे.

सोनुर्ली हे महाराष्ट्र-तेलंगणा सीमेवर असल्याने या क्लबमध्ये तेलंगणा राज्यातील विविध भागांतून जुगार खेळण्यासाठी व्यक्ती येत असल्याची चर्चा आहे. छाप्यातही तेलंगणा राज्यातील विविध जिल्ह्यांतील अनेक व्यक्ती आढळून आल्या. त्यामुळे या क्लबच्या आर्थिक व्यवहारांची आणि जुगाराच्या नेटवर्कची व्याप्ती तपासण्याचे आव्हान पोलिसांसमोर आहे.

दरम्यान, क्लबच्या व्यवस्थापनामध्ये काही राजकीय नेत्यांची भागीदारी असल्याची स्थानिक पातळीवर चर्चा असल्याचे सांगितले जात आहे. मात्र, या चर्चेला अधिकृत पुष्टी झालेली नाही. त्यामुळे क्लबची मालकी, आर्थिक व्यवहार आणि व्यवस्थापनातील संबंधित व्यक्तींची भूमिका पोलिस तपासातून स्पष्ट होणार आहे.

या प्रकरणी महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम ४ व ५ तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियमातील संबंधित कलमांनुसार कारवाई करण्यात आली आहे. जप्त मोबाईल, रोख रक्कम आणि हिशोबाची कागदपत्रे या प्रकरणाच्या पुढील तपासात महत्त्वाची ठरण्याची शक्यता आहे.

## एकीकडे शाळेचा कायापालट तर दुसरीकडे गैरवर्तनाची हद्द?

**गरंडा जिल्हा परिषद शाळेच्या आवारात दारूच्या बाटल्या अन् उकिरडा, ग्रामस्थांचा कौतुकास्पद लोकसहभाग, मात्र टवाळखोरांच्या उपद्रवामुळे शैक्षणिक वातावरण धोक्यात**




**दै. सिंहवाणी वृत्त, पारशिवनी**

एकीकडे लोकसहभागातून शाळेचे रूपडे पालटायचे आणि दुसरीकडे त्याच शिक्षणाच्या पवित्र मंदिराचे टवाळखोरांनी विद्रूपीकरण करायचे, असा संतापजनक विरोधाभास जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गरंडा येथे पाहायला मिळत आहे. ग्रामस्थांच्या मदतीने शाळेत विविध भौतिक सुविधा उपलब्ध होत असतानाच, दुसरीकडे रात्रीच्या वेळी शाळेच्या आवारात दारूच्या बाटल्या फेकणे आणि कंपाऊंड वॉलला लागूनच कचऱ्याचा उकिरडा तयार करण्याचे प्रकार वाढले आहेत.

शाळेचा दर्जा सुधारावा आणि विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी गरंडा येथील ग्रामस्थ, शिक्षणप्रेमी आणि शिक्षकांनी एकत्र येत लोकसहभागातून मोठ्या प्रमाणात निधी व साहित्य जमा केले. या माध्यमातून शाळेत भारतीय संविधान स्तंभ, आकर्षक प्रवेशद्वार, वाचनालयाचे पुस्तक कपाट, राजमाता जिजाऊ शिवराई स्मृती परिसर, साने गुरुजी बालोद्यान, बळीराजा परसबाग, झेरॉक्स मशीन, विविध भौतिक सुविधा, आकर्षक रंगरंगोटी आणि शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्यात आले. गावातील या सकारात्मक उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. परंतु, या कौतुकास्पद कामगिरीला असामाजिक तत्त्वांकडून गालबोट लागत आहे. गावातील अवैध दारू विक्रीमुळे रात्रीच्या सुमारास काही टवाळखोर आणि मद्यपी दारू पिऊन शाळेच्या आवारात रिकाम्या बॉटल्स बिनधास्तपणे फेकतात. याशिवाय, शाळेच्या कंपाऊंड वॉलला लागूनच उकिरडा तयार केलेला आहे. यामुळे परिसरात दुर्गंधी पसरली असून विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे.

**ग्रामस्थ आणि पालकांची मागणी**

निसर्गरम्य आणि समृद्ध शैक्षणिक वातावरणात आमच्या मुलांना शिक्षण मिळावे म्हणून आम्ही लोकसहभागातून मुलांच्या भविष्यासाठी शाळा सजवली, पण काही उपद्रवी तत्त्वांमुळे शाळेचे परिसर अस्वच्छ आणि धोकादायक होत आहे. या असामाजिक प्रवृत्तीचा ताबडतोब बंदोबस्त करावा आणि कंपाऊंड वॉलजवळील उकिरडा तात्काळ हटवून कचरा टाकणाऱ्यांवर प्रशासनाने कडक कारवाई करावी. शाळेच्या सुरक्षेसाठी आणि विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी संबंधित पंचायत प्रशासन आणि पोलीस विभागाने या प्रकाराची गंभीर दखल घेऊन टवाळखोरांचा तात्काळ बंदोबस्त करावा, अशी जोरदार मागणी आता पालकांमधून केली जात आहे.

## पूर्व केंद्रीय मंत्री शाहनवाज हुसैन ने ताजबाग में पेश की चादर, देश में अमन-चैन और भाईचारे की मांगी दुआ

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपुर :** पूर्व केंद्रीय मंत्री एवं भाजपा के वरिष्ठ नेता श्री शाहनवाज हुसैन ने रविवार की दोपहर उमरेड रोड, बड़ा ताजबाग स्थित हजरत बाबा ताजुद्दीन रहमतुल्लाह अलैह के आस्ताने पर हाजिरी दी. इस दौरान उन्होंने बाबा ताजुद्दीन रहमतुल्लाह अलैह



के मजार-ए-अकदस पर अकीदत के फूल और चादर पेश की तथा देश में अमन, शांति और आपसी भाईचारे की मजबूती के लिए विशेष दुआ मांगी. दरगाह परिसर आगमन पर हजरत बाबा ताजुद्दीन ट्रस्ट के चेयरमैन श्री प्यारे जिया खान ने शाहनवाज हुसैन का दस्तारबंदी कर भव्य स्वागत और सम्मान किया. इस अवसर पर हजरत बाबा ताजुद्दीन ट्रस्ट के चेयरमैन प्यारे जिया खान, सचिव ताज अहमद राजा, उपाध्यक्ष डॉ. सुरेंद्र जिचकार, ट्रस्टी हाजी फारूकभाई बावला, इमरान खान ताजी, गजेंद्रपाल सिंह लोहिया एवं मुस्तफाभाई टोपीवाला प्रमुख रूप से उपस्थित थे।

# शिक्षक झाले कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरासाठी सक्षम

## जीवन विकास विद्यालयात विशेष मार्गदर्शन कार्यशाळा

**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**

बदलत्या तंत्रज्ञानाच्या युगात शिक्षण अधिक आधुनिक, प्रभावी आणि विद्यार्थ्यांसाठी रंजक करण्याच्या दृष्टीने जीवन विकास विद्यालय व जीवन विकास वनिता विद्यालय, उमरेड येथील शिक्षकांसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापराबाबत विशेष मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत दोन्ही विद्यालयांतील १०० हून अधिक शिक्षकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

मा. शिक्षणाधिकारी माध्यमिक, जिल्हा परिषद, नागपूर यांच्या माध्यमातून महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादितच्या अधिकृत




प्रशिक्षण संस्थेच्या वतीने तसेच नेटवर्क संगणक शिक्षण, उमरेड यांच्या सहकार्याने ही कार्यशाळा घेण्यात आली.

कार्यशाळेत शिक्षकांना कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे काय, त्याचा शिक्षण क्षेत्रात कसा उपयोग करता येतो आणि अध्यापन अधिक सोपे व परिणामकारक कसे करता येईल, याबाबत प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन करण्यात आले. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने शैक्षणिक साहित्य तयार करणे, विद्यार्थ्यांसाठी विषयानुरूप उपक्रम व माहिती तयार करणे, अध्यापनाचे नियोजन करणे, प्रश्नपत्रिका व सराव साहित्य तयार करणे तसेच दैनंदिन शैक्षणिक कामकाज अधिक सुलभ करण्याच्या पद्धती शिक्षकांना शिकविण्यात आल्या.



शिक्षकांची जागा घेण्यासाठी नव्हे, तर शिक्षकांच्या ज्ञानाला आणि कार्यक्षमतेला अधिक बळ देण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता हे प्रभावी साधन ठरू शकते, या दृष्टिकोनातून कार्यशाळेत मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांना बदलत्या तंत्रज्ञानाशी जोडताना शिक्षकांनी त्याचा योग्य, सुरक्षित आणि जबाबदारीने वापर करावा, यावरही भर देण्यात आला.

कार्यक्रमाच्या मंचावर जीवन विकास विद्यालयाचे मुख्याध्यापक दिनेश चुऱ्हे, महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादितच्या नागपूर जिल्हा समन्वयक मानसी घोसेकर, वेदांती मंगलगिरी, मुस्कान शेख, नेटवर्क संगणक शिक्षणचे संस्थाचालक जगदीश वैद्य तसेच अमर पाटील यांची उपस्थिती होती.

कार्यशाळेदरम्यान शिक्षकांनी विविध संकल्पना समजून घेत स्वतः कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साधनांचा वापर करून पाहिला. त्यामुळे अध्यापनातील वेळ वाचविणे, शैक्षणिक साहित्याची निर्मिती करणे आणि विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार शिक्षण अधिक परिणामकारक करण्याच्या दृष्टीने शिक्षकांना प्रत्यक्ष अनुभव मिळाला. आधुनिक तंत्रज्ञानाचा शिक्षणात योग्य वापर करून शिक्षकांना काळानुरूप सक्षम करण्याच्या दृष्टीने ही कार्यशाळा महत्त्वपूर्ण ठरली. कार्यशाळेचे प्रास्ताविक नितीन सेलोटे यांनी केले, तर संचालन संजय विसपुते यांनी केले. दोन्ही विद्यालयांतील १०० हून अधिक शिक्षकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून कार्यशाळेला उत्तम प्रतिसाद दिला.